दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक ३३३ I बुधवार १६ सप्टेंबर २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## दुचाकी अपघातात वृद्धाचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील कानडगाव ते वरशिंदे रस्त्यावर भरधाव वेगाने व निष्काळजीपणे दुचाकी चालविताना झालेल्या अपघातात ५८ वर्षीय दत्तात्रय माधव लोंढे (रा. कानडगाव, ता. राहुरी) यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी मृताच्या नातेवाईकांनी फिर्याद देण्यास टाळाटाळ केल्याने पोलिस कर्मचारी राजू परसराम पुंड यांनी सरकारतर्फे फिर्याद दाखल केली. विशेष म्हणजे, अपघातानंतर तब्बल आठ महिन्यांनी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**फिर्याद देण्यास नातेवाईकांची टाळाटाळ; आठ महिन्यांनी सरकारतर्फे गुन्हा दाखल**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ७ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी सव्वाचार वाजण्याच्या सुमारास दत्तात्रय लोंढे हे बजाज कंपनीची एमएच १७ ए. क्यू. ८२२० क्रमांकाची दुचाकी घेऊन कानडगाव ते वरशिंदे रस्त्याने घरी जात होते. यावेळी दुचाकी भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालविल्याने त्यांचा अपघात झाला. दुचाकीवरून खाली पडल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. अपघातात दुचाकीचेही नुकसान झाले.

अपघाताची माहिती पोलिसांना १४ जानेवारी २०२६ रोजी मिळाली होती. मात्र, मृताच्या नातेवाईकांनी फिर्याद देण्यास टाळाटाळ केल्याने अखेर पोलिस कर्मचारी राजू पुंड यांनी सरकारतर्फे फिर्यादी होत तक्रार दाखल केली. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल आर. एम. सानप करीत आहेत.

# जरांगेंचा मराठा जनसागर मुंबईकडे निघाला

## कॅबिनेटमध्ये जरांगेंच्या भूमिकेवर तीव्र नाराजी; गणेशोत्सवाच्या काळातील आंदोलनावरही मंत्र्यांचे आक्षेप

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**मुंबई/बीड :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी सरकारकडून मागण्या मान्य न झाल्याने अखेर मुंबईकडे कूच केली आहे. अंतरवाली सराटीतील उपोषण सुरूच ठेवून रुग्णवाहिका आणि दोन वाहनांसह जरांगे पाटील मुंबईच्या दिशेने रवाना झाले. त्यांच्या ताफ्यासोबत मोठ्या संख्येने मराठा बांधव सहभागी झाले असून, बीड जिल्ह्यात ठिकठिकाणी त्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात येत आहे. मुंबई पोलिसांनी जरांगे पाटील (पान ४ वर)



### ‘सरकार मराठा समाजाच्या हितासाठी सकारात्मक’

राज्य सरकार मराठा समाजाच्या हितासाठी सकारात्मक असून आरक्षणाच्या प्रश्नावर सातत्याने निर्णय घेत आहे. असे असतानाही आंदोलनकर्त्यांकडून सरकारवर सातत्याने टीका केली जात असल्याबद्दल मंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. मराठा समाजाला टिकणारे आरक्षण देण्यासाठी सरकार कटिबद्ध असून, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर सरकारने कडक भूमिका घ्यावी, अशी मागणी मंत्र्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केल्याचे समजते.

### जरांगेंच्या भाषेवर मंत्र्यांचा आक्षेप

कॅबिनेट बैठकीत मनोज जरांगे पाटील यांच्याकडून सरकारवर करण्यात येणारी टीका आणि वापरल्या जाणाऱ्या भाषेबाबत मंत्र्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केल्याचे समोर आले आहे. त्यांची भाषा अयोग्य असून राजकीय संस्कृतीला न शोभणारी असल्याचा सूर मंत्र्यांनी बैठकीत व्यक्त केला. याबाबत मंत्र्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे आपली भूमिका स्पष्टपणे मांडली.

### ‘गणेशोत्सवाच्या काळात आंदोलन का?’

गणेशोत्सवाच्या काळात मुंबईत मोठ्या प्रमाणावर भाविक आणि पर्यटक दाखल होत असतात. अशा परिस्थितीत याच काळात मुंबईत आंदोलन करून कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करण्याचा प्रयत्न का केला जात आहे, असा सवाल मंत्र्यांनी कॅबिनेट बैठकीत उपस्थित केल्याचे वृत्त आहे. सणाच्या काळात आंदोलनामुळे नागरिकांना आणि प्रशासनाला अडचणी निर्माण होऊ शकतात, अशी भूमिका मंत्र्यांनी मांडली.

# अकारी पडीत जमिनी वाटपाचा शासनाचा निर्णय

## वर्षानुवर्षांच्या संघर्षाला अखेर न्याय

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हरेगाव मळ्यातील ५१० खातेदारांच्या वारसांना मिळणार**

**हक्काची जमीन**

**सुमारे ३ ते ४ हजार एकर वाटपाचा अंदाज**





■ शेती महामंडळाच्या जमिनी मूळ मालकांच्या नावावर व्हाव्यात यासाठी कॉ. माधवराव गायकवाड आणि खासदारांच्या नेतृत्वाखाली अनेक वर्षे संघर्ष झाला. महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर शेवटच्या शेतकऱ्याला न्याय मिळेपर्यंत प्रयत्न करता आले, याचे समाधान आहे. मंत्रिमंडळाचा निर्णय हा शेतकऱ्यांच्या दीर्घ संघर्षाचा विजय आहे.

–राधाकृष्ण विखे पाटील

**श्रीरामपूर :** हरेगाव मळ्यातील शेती महामंडळाच्या ताब्यात असलेल्या अकारी पडीत जमिनी मूळ मालकांच्या वारसांच्या नावावर करण्याच्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाने मंगळवारी मंजुरी दिल्याने अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या शेतकऱ्यांच्या न्यायालयीन आणि शासनस्तरीय संघर्षाला अखेर यश आले आहे. या निर्णयामुळे सुमारे ५१० मूळ अकारी पडीत खातेदार शेतकऱ्यांच्या वारसांना कमाल जमीनधारण कायद्यानुसार हक्काची जमीन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, अंदाजे तीन ते चार हजार एकर जमिनीचे वाटप होण्याची शक्यता आहे. यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हे यश आल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शेती महामंडळाच्या ताब्यातील हरेगाव मळ्यातील जमिनी पुन्हा मूळ मालकांच्या वारसांना मिळाव्यात, यासाठी शेतकऱ्यांनी अनेक वर्षे संघर्ष केला. (पान ४ वर)

## ट्रॅक्टरच्या चाकाखाली चिरडून चिमुकल्याचा मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**जामखेड :** गणेशोत्सवाचा उत्साह आणि आनंदाचे वातावरण असतानाच जामखेड तालुक्यातील मतेवाडी (जवळा) परिसरात एक अतिशय अत्यंत दुर्दैवी आणि हृदयद्रावक घटना घडली आहे. सोमवारी (दि. १४ सप्टेंबर) गणेश स्थापनेच्याच दिवशी ट्रॅक्टरच्या चाकाखाली चिरडून देवांश सचिन मते अवघ्या सव्वा वर्षाच्या या चिमुकल्याचा जागीच मृत्यू झाला. मते कुटुंबाचा तो एकुलता एक मुलगा होता. या घटनेमुळे मतेवाडी आणि जवळा परिसरावर शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, देवांशचे वडील (पान ४ वर)

## अवजड वाहतुकीच्या चक्राखाली आणखी एक जीव

### संगमनेरच्या दिल्ली नाक्यावर महिलेचा दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बाह्यवळण रस्ता असूनही शहरातून धावणाऱ्या वाहनांवर नागरिकांचा संताप**

**झरेकाठी :** सकाळ-संध्याकाळची नेहमीची लगबग... रस्त्यावरून ये-जा करणारे नागरिक आणि त्याच रस्त्यावरून वेगाने धावणारे अवजड कंटेनर. संगमनेर शहरातील दिल्ली नाका परिसरात मात्र या नेहमीच्या वाहतुकीने एका कुटुंबावर काळाचा घाला घातला. कंटेनरखाली चिरडून सुमया मतीन तांबोळी (वय ४०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला आणि त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला. या घटनेने परिसरातील नागरिकांनाही हादरवून सोडले असून, ‘आणखी किती जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार?’ हा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.



संगमनेर शहराला बाह्यवळण रस्ता उपलब्ध असतानाही शहरातील प्रमुख रस्त्यांवरून ट्रक, कंटेनर आणि अन्य अवजड वाहने मोठ्या प्रमाणात धावत असल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न गंभीर बनला आहे. दिल्ली नाका परिसरातील अपघाताने या प्रश्नाला पुन्हा एकदा ऐरणीवर आणले आहे. मोठ्या वाहनांच्या चाकांखाली चिरडणाऱ्या प्रत्येक जीवामागे एक कुटुंब, त्यांची स्वप्ने आणि त्यांच्या आप्तांच्या आयुष्याशी जोडलेली नाती असतात. त्यामुळे (पान ४ वर)

# अकारी पडीत : श्रेय विखे पाटलांना

## पुढील वाटप प्रक्रिया त्यांच्या मार्गदर्शनाखालीच होणार : ॲड. अजित काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** श्रीरामपूर तालुक्यातील शेती महामंडळाच्या हरिगाव मळा हद्दीतील नऊ गावांतील अकारी पडीत शेतकऱ्यांना जमिनी परत देण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाल्याचे सांगत, या निर्णयाचे संपूर्ण श्रेय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना देत आहोत. तसेच, वारसदार शेतकऱ्यांना जमिनींचे वाटप करण्याची पुढील प्रक्रिया त्यांच्या मार्गदर्शनाखालीच होणार असल्याचे प्रतिपादन शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अकारी पडीत शेतकरी संघटनेच्या न्यायालयीन लढ्याचे प्रमुख ॲड. अजित काळे यांनी केले.

मंगळवारी (दि. १५) राज्य मंत्रिमंडळाची बैठक होणार की नाही, याबाबत मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईकडे सुरू असलेल्या आंदोलनामुळे साशंकता निर्माण झाली होती. मात्र, ही बैठक पार पडली. बैठकीत हरिगाव मळ्यातील नऊ गावांतील अकारी पडीत शेतकऱ्यांना जमिनी परत देण्याचा निर्णय झाल्याचे वृत्त सोशल मीडियावरून गावोगावी पोहोचताच शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अनेक गावांत फटाक्यांची आतषबाजी करून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

या पार्श्वभूमीवर नऊ गावांतील शेतकऱ्यांनी ॲड. अजित काळे यांना श्रीरामपूर येथे येण्याची विनंती केली. त्यानुसार, कांदा मार्केटजवळील त्यांच्या संपर्क कार्यालयासमोर छोटेखानी आनंदोत्सवाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपस्थित शेतकरी व कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना ॲड. काळे यांनी मंत्रिमंडळाच्या निर्णयाचे श्रेय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना दिले. जमिनींच्या पुढील वाटप प्रक्रियेतही त्यांच्या मार्गदर्शनाची महत्त्वाची भूमिका राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, निर्णयानंतर नऊ गावांत काही जणांकडून फटाके वाजवून विविध व्यक्तींच्या नावांच्या घोषणा दिल्या जात असल्याकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांनी संयम बाळगावा, असे आवाहनही ॲड. काळे यांनी केले.या आनंदोत्सव सोहळ्यास नऊ गावांतील प्रमुख वारसदार शेतकरी, शेतकरी संघटनेचे पदाधिकारी आणि शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.



## २६/११च्या शौर्याचा सन्मान...

# आता कल्पना पवारांच्या खांद्यावर ‘खाकी’ची जबाबदारी!

### हुतात्मा अंबादास पवार यांच्या पत्नी प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक म्हणून श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात रुजू

राष्ट्र सह्याद्री । स्पेशल स्टोरी

**श्रीरामपूर :** काही कथा काळाच्या ओघात संपत नाहीत; त्या पुढच्या पिढ्यांना प्रेरणा देत राहतात. २६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यात देशासाठी प्राणाचे बलिदान देणारे श्रीरामपूरचे शूरवीर हुतात्मा अंबादास पवार यांची शौर्यगाथाही अशीच आहे. पतीच्या वीरमरणानंतर आयुष्याने समोर उभ्या केलेल्या असंख्य आव्हानांना सामोरे जात कुटुंबाची जबाबदारी समर्थपणे पेलणाऱ्या कल्पना पवार आता त्याच खाकी वर्दीत पोलीस अधिकारी म्हणून सेवेत दाखल झाल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाने कल्पना पवार यांची थेट पोलीस उपअधीक्षक पदावर नियुक्ती केली आहे. नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकादमीत आवश्यक प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर त्या नुकत्याच श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक म्हणून रुजू झाल्या आहेत. त्यामुळे पतीच्या बलिदानाने सुरू झालेल्या एका कुटुंबाच्या संघर्षाला आता कर्तव्याच्या नव्या पर्वाची जोड मिळाली आहे. २६ नोव्हेंबर २००८.



### शासनाच्या निर्णयाने संघर्षाला नवी दिशा

शहीद अंबादास पवार यांच्या कुटुंबाच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर महाराष्ट्र शासनाने कल्पना पवार यांना पोलीस उपअधीक्षक पदावर सेवेत सामावून घेण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे केवळ एका कुटुंबाला शासकीय सेवेत स्थान मिळाले असे नाही, तर देशासाठी बलिदान देणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्याच्या कुटुंबाच्या त्यागाची शासनाने दखल घेतल्याचा संदेशही गेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा प्रश्न संवेदनशीलतेने हाताळत कल्पना पवार यांच्या नियुक्तीचा मार्ग मोकळा केला. शहीदाच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत किंवा सन्मान देण्यापलीकडे जाऊन पोलीस दलात अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळणे, ही या निर्णयाची विशेष बाब ठरते.

### बलिदानातून सेवेकडे...

अंबादास पवार यांनी देशासाठी दिलेले बलिदान इतिहासाचा भाग झाले; मात्र त्यांच्या कुटुंबाने त्यानंतर केलेला संघर्ष तितकाच महत्त्वाचा आहे. शहीदाच्या पत्नीने परिस्थितीसमोर हार न मानता कुटुंब उभे केले आणि आता स्वतः पोलीस अधिकारी म्हणून जनसेवेत प्रवेश केला आहे. शौर्याची परंपरा रक्तातूनच पुढे जाते असे नाही; ती संस्कार, जिद्द आणि कर्तव्यनिष्ठेतूनही पुढे जाते. कल्पना पवार यांचा प्रवास त्याचेच उदाहरण आहे.

मुंबईवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याने संपूर्ण देश हादरला. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनससह मुंबईतील विविध ठिकाणी दहशतवाद्यांनी हल्ला केला. त्या संकटाच्या काळात (पान ४ वर)

## काठीचा धाक दाखवत चिमुकल्याला मारहाण!

### जवखेडे खालसा शाळेतील शिक्षकाविरुद्ध गुन्हा; पालक व ग्रामस्थ संतप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** तालुक्यातील जवखेडे खालसा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता चौथीत शिकणाऱ्या दहा वर्षीय विद्यार्थ्याला शिक्षकाने काठीने मारहाण केल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

वर्गातील एका विद्यार्थ्याच्या पाठीला हात लावल्याच्या कारणावरून शिक्षकाने मारहाण केल्याचा आरोप विद्यार्थ्याच्या आईने केला आहे. याप्रकरणी पाथर्डी पोलिस ठाण्यात शिक्षक संदीप कुंडलिक मचे यांच्याविरुद्ध मुलांची काळजी व संरक्षण कायद्यातील कलम ७५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रुद्राक्ष बापुराव सोनवणे हा विद्यार्थी जवखेडे खालसा येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्र शाळेत इयत्ता चौथीत शिकतो. गुरुवारी (दि. ११) सकाळी त्याची आई त्याला शाळेत सोडून गेली. सायंकाळी शाळा सुटल्यानंतर आई मुलाला घेण्यासाठी आली असता रुद्राक्ष रडत असल्याचे तिच्या निदर्शनास आले. रडण्याचे कारण विचारले असता, वर्गातील एका विद्यार्थ्याच्या पाठीला हात लावल्याच्या कारणावरून शिक्षकाने काठीने मारहाण केल्याचे त्याने सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. मारहाणीमुळे तो घाबरल्याचेही सांगण्यात आले. (पान ४ वर)

# तीन पिढ्यांचा संघर्ष फळाला... आता हक्काच्या जमिनीचा क्षण!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

जमीन ही शेतकऱ्यासाठी केवळ मालमत्ता नसते. ती त्याच्या कुटुंबाच्या अस्तित्वाची, श्रमाची आणि पुढच्या पिढीच्या भविष्याची हमी असते. म्हणूनच श्रीरामपूर तालुक्यातील हरेगाव मळ्यातील अकारी पडीत जमिनींचा प्रश्न हा केवळ महसूल विभागाच्या फाईलमधील विषय नव्हता; तो तीन पिढ्यांच्या अस्मितेचा आणि हक्काचा संघर्ष होता. या संघर्षाला आता राज्य मंत्रिमंडळाच्या निर्णयाने निर्णायक वळण मिळाले आहे. मात्र, मंत्रिमंडळाचा निर्णय हा या लढ्याचा शेवट नसून हक्क प्रत्यक्ष सातबारा उताऱ्यावर उतरविण्याची सुरुवात आहे.

हरेगाव मळ्यातील जमिनींचा इतिहास जुना आहे. सिंचन प्रकल्पाच्या पार्श्वभूमीवर या जमिनी ताब्यात घेण्यात आल्या, पुढे त्या अतिरिक्त जमीन म्हणून शेती महामंडळाकडे गेल्या. मूळ शेतकरी आणि त्यांच्या वारसांनी मात्र आपला हक्क सोडला नाही. काळ बदलला, पिढ्या बदलल्या; पण जमिनी परत मिळाव्यात ही मागणी कायम राहिली. काही शेतकरी या जगातून गेले, त्यांच्या पुढच्या पिढीने न्यायालयीन लढा पुढे नेला आणि आज तिसरी पिढी त्या संघर्षाचा निकाल पाहत आहे.

या लढ्याचा एक महत्त्वाचा टप्पा २०१२ नंतर आला. खंडकरी शेतकऱ्यांना जमीन परत देण्याची प्रक्रिया सुरू असताना हरेगाव मळ्याच्या जमिनींची कायदेशीर स्थिती वेगळी असल्याने हा भाग त्यातून सुटला. त्यामुळे न्यायालयीन लढ्याचा मार्ग स्वीकारण्यात आला. गिरीधर आसने यांनी २०१२ मध्ये याचिका दाखल केली; पुढे जयदीप आसने यांनी अवमान याचिकेद्वारे पाठपुरावा केला. १४ ऑगस्ट २०२४ रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने मूळ मालकांना जमीन देण्याच्या बाजूने निकाल देत शासनाने आठ आठवड्यांत प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश दिले.

पण न्यायालयाचा आदेश आणि प्रत्यक्ष जमीनवाटप यांच्यातील अंतर किती मोठे असते, हे अकारी पडीत शेतकऱ्यांनी अनुभवले. त्यामुळे आंदोलनांची मालिकाही सुरू राहिली. रास्ता रोको, निवेदने, बैठका, उपोषण आणि अन्नत्याग आंदोलनातून शेतकऱ्यांनी सरकारचे लक्ष वेधले. ऑगस्ट २०२६ मध्ये हरेगाव येथे ॲड. अजित काळे यांच्या नेतृत्वाखाली अन्नत्याग आंदोलन झाले. पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आंदोलनस्थळी जाऊन महसूलमंत्र्यांशी संपर्क साधला आणि पुढील प्रक्रिया वेगाने करण्याचे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

याच काळात या प्रश्नाला आणखी एक गुंतागुंत होती. हरेगाव मळ्यातील काही जमीन उद्योग किंवा संरक्षणविषयक प्रकल्पांसाठी वापरण्याची चर्चा. त्यामुळे शेतकऱ्यांच्या मनात अस्वस्थता वाढणे स्वाभाविक होते. परंतु सरकारने आधी मूळ हक्कदारांचा प्रश्न सोडवावा, अशी मागणी सातत्याने पुढे आली. महसूल विभागाच्या २०२५ मधील सुधारणांमध्येही विशिष्ट परिस्थितीत अकारी पड म्हणून घोषित झालेल्या जमिनी मूळ जमीनमालक किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याची तरतूद करण्यात आली होती.

आता १५ सप्टेंबर २०२६ रोजी राज्य मंत्रिमंडळाने महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणेची कमाल मर्यादा) अधिनियम, १९६१ मध्ये सुधारणा करण्यास मान्यता दिली आहे. हरेगाव मळ्यातील सुमारे ६ हजार एकर जमीन मूळ शेतकरी किंवा त्यांच्या वारसांना परत करण्याचा मार्ग या निर्णयामुळे मोकळा झाला आहे.

हा निर्णय स्वागतार्ह आहे. पण येथेच शासनाने आत्मसंतुष्ट होता कामा नये. शेतकऱ्याला आश्वासन नको, अंमलबजावणी हवी. कायद्यातील सुधारणा, राज्यपालांची मान्यता, शासन निर्णय, पात्र खातेदारांची यादी, वारस नोंदी, मोजणी, प्रत्यक्ष वाटप आणि सातबारा, या प्रत्येक टप्प्यावर पारदर्शकता आणि वेग आवश्यक आहे. वर्षानुवर्षे वाट पाहिलेल्या कुटुंबांना पुन्हा एखाद्या कार्यालयाच्या दारात वर्षानुवर्षे उभे राहावे लागू नये.

या संघर्षाचे श्रेय एका व्यक्तीला किंवा एका संघटनेला देणेही इतिहासाशी न्याय करणारे ठरणार नाही. शेतकऱ्यांच्या पिढ्यान्पिढ्यांच्या चिकाटीपासून न्यायालयीन लढा देणाऱ्या याचिकाकर्त्यांपर्यंत, आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांपासून शासनस्तरावर पाठपुरावा करणाऱ्या लोकप्रतिनिधींपर्यंत अनेकांचे योगदान या प्रवासात आहे. राधाकृष्ण विखे पाटील यांनी महसूलमंत्री आणि पालकमंत्री म्हणून केलेल्या पाठपुराव्याची नोंद निश्चितच घ्यावी लागेल; परंतु त्याचबरोबर जमीन गमावूनही हक्काची आशा न सोडणाऱ्या शेतकऱ्यांचा संघर्षच या निर्णयाचा खरा केंद्रबिंदू आहे.

आता खरी कसोटी सरकारची आहे. मंत्रिमंडळाचा निर्णय ऐतिहासिक तेव्हाच ठरेल, जेव्हा त्याचा लाभ शेवटच्या पात्र वारसदारापर्यंत कोणताही राजकीय, प्रशासकीय किंवा आर्थिक अडथळा न ठेवता पोहोचेल.तीन पिढ्यांनी जपलेली आशा आता कागदावर आली आहे. ती सातबाऱ्यावर उतरविण्याची जबाबदारी शासनाची आहे. कारण अकारी पडीत जमिनींचा हा प्रश्न केवळ जमिनीचा नाही, तो 'हक्कासाठी कितीही काळ संघर्ष करू' या शेतकरी वृत्तीचा विजय आहे.

# राधाकृष्ण विखे पाटील ट्रक वाहतूक संस्थेला १६ लाखांचा नफा सभासदांना १५ टक्के लाभांश




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : राहाता तालुक्यातील प्रवरानगर येथील आमदार राधाकृष्ण विखे पाटील सहकारी ट्रक वाहतूक संस्थेला अहवाल वर्षात १६ लाख ३१ हजार रुपयांचा नफा झाला असून सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याची घोषणा करण्यात आली. संस्थेची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी संस्थेच्या मुख्य कार्यालयातील सभागृहात झाली.

संस्थेला सातत्याने 'अ' वर्ग मिळत असून, सभासदांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. संस्थेमार्फत रोख खरेदीवर स्पेअर पार्टसाठी १० टक्के सवलत दिली जाते. लोणी, कोल्हार व साकुरी येथे स्पेअर पार्टची दुकाने सुरू आहेत. संस्थेच्या मालकीचे दोन पेट्रोल पंप असून आणखी तीन पेट्रोल पंप संस्थेने चालविण्यास घेतले आहेत. साकुरी येथील सीएनजी पंपाचे काम पूर्ण झाले असून पुढील पंधरवड्यात त्याचे लोकार्पण होणार असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

१९३ सभासद असलेल्या या संस्थेमार्फत पद्मश्री डॉ. विखे पाटील सहकारी साखर कारखान्यास ट्रकद्वारे ऊसाची वाहतूक केली जाते. आगामी वर्ष संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने ही संस्थेसाठी अभिमानाची बाब असल्याचे सांगण्यात आले.

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संस्थेच्या आतापर्यंतच्या वाटचालीचे व कामकाजाचे कौतुक केले. आगामी ऊस गळीत हंगाम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे योगदान महत्त्वाचे ठरणार असल्याचे त्यांनी सांगितले. संस्थेचे अध्यक्ष नंदकिशोर राठी, उपाध्यक्ष सुनील जाधव व संचालक मंडळाच्या कामाचेही त्यांनी कौतुक केले.

सभेच्या प्रारंभी उपाध्यक्ष सुनील जाधव यांनी प्रास्ताविक केले. व्यवस्थापक जालिंदर खर्डे यांनी आभार मानले. सभेपुढील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले. यावेळी ज्येष्ठ नेते माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, प्रवरा बँकेचे अध्यक्ष डॉ. भास्करराव खर्डे पाटील, बाजार समितीचे उपसभापती अण्णासाहेब कडू यांच्यासह संचालक, सभासद व कामगार उपस्थित होते.

# राजे छत्रपती युवा प्रतिष्ठान आदर्श : अप्पर पोलीस अ. वाकचौरे



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गणेशोत्सव प्रदूषणमुक्त, व्यसनमुक्त आणि पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करून प्रशासनास सहकार्य करावे. तसेच, ज्या गणेश मंडळात महिला व मुलींचा सहभाग अधिक असतो, ते मंडळ माझ्या दृष्टीने आदर्श आहे असेच कार्य राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानचे असल्याचे प्रतिपादन अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी केले.

राहुरी फॅक्टरी येथील ताहाराबाद रोड परिसरातील राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानच्या गणरायाची प्राणप्रतिष्ठा अपर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी ते बोलत होते.

प्रारंभी राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानचे तरुण, महिला व बालगोपालांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास अभिवादन केले. त्यानंतर बारामती येथील अमर ब्रास बँडच्या गजरात गणरायाची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत महिला व मुलींचा लक्षणीय सहभाग होता. त्यानंतर श्री.वाकचौरे यांच्या हस्ते विधिवत पूजा करून गणरायाची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. यावेळी पौरोहित्य सुनील काळे गुरू यांनी केले.

राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानने गणेशोत्सवाच्या माध्यमातून महिला व मुलींना मोठ्या प्रमाणात सहभागी करून घेतल्याबद्दल अप्पर पोलीस अधीक्षक सोमनाथ वाकचौरे यांनी प्रतिष्ठानच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक केले. समाजातील महिलांचा आणि मुलींचा सहभाग वाढविणारे असे उपक्रम इतर गणेश मंडळांसाठीही प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.याप्रसंगी नगरसेवक तथा गटनेते प्रकाश संसारे, पोलीस निरीक्षक रविंद्र देशमुख, प्रशिक्षणार्थी पोलीस उपनिरीक्षक गोरक्षनाथ शेटे, नगरसेवक बाळासाहेब लोखंडे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रदीप उर्फ पिनू गरड, पोलीस कॉन्स्टेबल बाबासाहेब शेळके, शेषराव कुटे आदींसह राजे छत्रपती युवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, सदस्य व गणेशभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महंत सुनीलगिरी महाराजांचे बारा दिवसीय मौनव्रत व अनुष्ठान सुरू



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मुकींदपूर येथील श्रीराम साधना आश्रमाचे प्रमुख गुरुवर्य महंत सुनीलगिरी महाराज यांच्या बारा दिवशीय मौनव्रत व अनुष्ठानास गणेशोत्सवाच्या प्रारंभापासून सुरुवात झाली. हे अनुष्ठान १४ ते २६ सप्टेंबरदरम्यान अनंत चतुर्दशीपर्यंत सुरू राहणार आहे. धर्माचे वैभव वाढावे आणि धर्मजागृती व्हावी, हा मौनव्रत व अनुष्ठानामागील मुख्य उद्देश असल्याचे महंत सुनीलगिरी महाराज यांनी सांगितले.

प्रभू रामचंद्र, ब्रह्मलीन योगिराज प्रल्हादगिरी महाराज व ब्रह्मलीन सद्गुरू स्वामी प्रकाशगिरी महाराज यांच्या कृपाशीर्वादाने तसेच देवगडचे महंत भास्करगिरी महाराज यांच्या प्रेरणेने गेल्या २६ वर्षांपासून गणेशोत्सवानिमित्त हे मौनव्रत व अनुष्ठान सुरू आहे. शुभारंभप्रसंगी महंत सुनीलगिरी महाराज यांनी आश्रमातील प्रभू रामचंद्रांचे तसेच तेथे स्थापित बारा ज्योतिर्लिंगांचे दर्शन घेतले.

साध्वी सुवर्णानंदगिरी महाराज चैतन्य म्हणाल्या की, महंत सुनीलगिरी महाराज यांचे धर्मकार्य धर्मजागृतीसाठी असून, त्यांच्या कार्यामुळे भाविकांमध्ये आध्यात्मिकता वाढीस लागली आहे.यावेळी संतसेवक वैभव निकम, पोपट महाराज निपुंगे, सीताराम निपुंगे, आप्पा बनकर, शुभम सुरोशे, प्रशांत पवार, आबासाहेब गायकवाड, विठ्ठल धनाळे, अशोक पवार यांच्यासह श्रीराम सेवा मंडळाचे सेवेकरी, ग्रामस्थ व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'बालवैज्ञानिक ते इस्रो शास्त्रज्ञ' : सुमती कुलकर्णींचा प्रेरणादायी प्रवास

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : प्रश्न विचारा, चिकित्सक विचार करा, निरीक्षण करा आणि संशोधनाची वृत्ती जोपासा. जिज्ञासा, प्रयोगशीलता व सातत्यपूर्ण प्रयत्नांतूनच भविष्यातील शास्त्रज्ञ घडतात, असा प्रेरणादायी संदेश इस्रोच्या शास्त्रज्ञ सुमती कुलकर्णी यांनी राहुरी येथे बालवैज्ञानिकांना दिला.

विद्यार्थीदशेत जनसेवा प्रतिष्ठानच्या माध्यमातून थुंबा येथील इस्रो सहलीदरम्यान शास्त्रज्ञांशी झालेला संवाद आणि 'डॉ. सी. व्ही. रमण बालवैज्ञानिक परीक्षा' हा आपल्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला. ज्या इस्रो केंद्राला विद्यार्थी म्हणून भेट दिली, त्याच ठिकाणी आज शास्त्रज्ञ म्हणून काम करताना अभिमान वाटतो, असे कुलकर्णी यांनी सांगितले.

राज्य विज्ञान शिक्षण संस्थेचे संचालक डॉ. राजकुमार अवसारे यांनी दैनंदिन जीवनातील समस्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून सोडविण्याचे आवाहन केले. महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे अधिष्ठाता डॉ. साताप्पा खरबडे यांनी नवीन वाणांच्या संशोधनाची माहिती देत विद्यार्थ्यांनी कृषी क्षेत्राकडे वळावे, असे सांगितले.

एमआयटी पुणे येथील विद्यार्थी संस्कार मेटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी तयार केलेल्या विमानाचे प्रत्यक्ष उड्डाण करून दाखविण्यात आले. या प्रात्यक्षिकाने बालवैज्ञानिक भारावून गेले.

अध्यक्षीय भाषणात प्रदीप सोमाणी यांनी विद्यार्थ्यांना आवडी-क्षमतांनुसार क्षेत्र निवडण्याची मुभा पालकांनी द्यावी, असे आवाहन केले. कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

# डॉ. सचिनकुमार नांदगुडे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट कृषी शास्त्रज्ञ पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे झालेल्या ५४ व्या संयुक्त कृषी संशोधन व विकास समितीच्या बैठकीत डॉ. सचिनकुमार नांदगुडे यांना राज्यस्तरीय उत्कृष्ट कृषी शास्त्रज्ञ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. कृषी अभियांत्रिकी क्षेत्रातील उल्लेखनीय संशोधन, अध्यापन, विद्यार्थी मार्गदर्शन आणि कृषी विकासातील योगदानाबद्दल त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.




डॉ. नांदगुडे हे डॉ. अण्णासाहेब शिंदे शासकीय कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी येथे मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभागाचे प्राध्यापक व प्रमुख आहेत. कृषी शिक्षण व संशोधन क्षेत्रातील सुमारे २५ वर्षांच्या कार्यकाळात त्यांनी विविध संशोधन प्रकल्प यशस्वीरीत्या राबविले आहेत. त्यांनी आयआयटी खरगपूर येथून एम.टेक. व पीएच.डी. पूर्ण केली असून अमेरिकेतील नेब्रास्का-लिंकन विद्यापीठात उत्तरपदवी संशोधन केले आहे.

त्यांच्या मार्गदर्शनाखाली ४० पदव्युत्तर व ११ आचार्य पदवी विद्यार्थ्यांनी संशोधन पूर्ण केले आहे. त्यांच्या नावावर ७६ संशोधन लेख, १२ पुस्तके, तीन पुस्तक अध्याय, तीन कॉपीराइट व पेटंट असून सात संशोधन प्रकल्पांचे मुख्य संशोधक म्हणून त्यांनी काम केले आहे. त्यांच्या संशोधनातून २३ शिफारशी, वाण, कृषी यंत्रे व अवजारे विकसित अथवा प्रसारित करण्यात योगदान मिळाले आहे.

या यशाबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्यासह अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. नांदगुडे यांचे अभिनंदन केले.

# शहागडाच्या विकासासाठी एकजुटीने पुढे यावे : नीलम खताळ



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : पेमगिरीच्या ऐतिहासिक शहागडाला मोठा ऐतिहासिक वारसा लाभला असून, हा इतिहास केवळ पेमगिरी किंवा संगमनेर तालुक्यापुरता मर्यादित न ठेवता महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात पोहोचविण्याची गरज आहे. शहागडाच्या विकासाचा ध्यास आमदार अमोल खताळ यांनी घेतला असून, त्यासाठी पेमगिरीकरांनी गावातील राजकारण, गट-तट बाजूला ठेवून एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन आदिशक्ती प्रतिष्ठानच्या अध्यक्षा नीलम खताळ यांनी केले.संगमनेर तालुक्यातील पेमगिरी येथील ऐतिहासिक शहागडावर हिंदवी स्वराज्य संकल्प दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी कोल्हापूर येथील शिवचरित्रकार डॉ. संदीप महिंद, फिरंगोजी नरसाळा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ॲड. किरण झिंजुरके, चंदनपुरीचे माजी सरपंच प्रमोद राहणे, श्रीक्षेत्र वढू येथील अंजली देशमुख, वर्षा डुबे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, महिला, विद्यार्थी व शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.डॉ. संदीप महिंद यांनी शहाजीराजे भोसले यांनी वेरूळहून सुमारे २०० ते २५० किलोमीटर प्रवास करून पेमगिरीच्या शहागडावर येत स्वराज्याचा संकल्प केल्याचे सांगितले. हा इतिहास महाराष्ट्रभर पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. पुढील वर्षी शहाजीराजांची प्रतिमा नव्हे, तर मूर्ती तयार करून पालखीतून शहागडावर आणावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

# गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी राहुरीत डीजेवर कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी डॉल्बी व डीजे वाजविण्यावर निर्बंध घातले आहेत. या आदेशाची अंमलबजावणी करत राहुरी पोलिसांनी गणेशमूर्ती स्थापना मिरवणुकीच्या पहिल्याच दिवशी विनापरवाना डीजे वाजविण्याचा प्रयत्न करणाऱ्या चालकावर कारवाई केली.

राहुरी शहरात गणेशमूर्ती स्थापना मिरवणूक सुरू असताना काही गणेश मंडळांकडून विनापरवाना डीजे लावण्याचा प्रयत्न करण्यात आला. हा प्रकार पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या निदर्शनास येताच त्यांनी तत्काळ हस्तक्षेप करून संबंधित डीजे चालकाला डीजे वाजविण्यास मनाई केली. पोलिसांनी चालकाला ताब्यात घेत जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन करण्याची सक्त ताकीद दिली. त्यानंतर डीजे न वाजविण्याच्या अटीवर त्याला सोडण्यात आ

गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पोलीस निरीक्षक देशमुख यांनी घेतलेल्या या भूमिकेचे ज्येष्ठ नागरिकांसह सुज्ञ नागरिकांनी स्वागत केले. उत्सव काळात ध्वनिप्रदूषणाला आळा घालण्यासाठी पोलिसांनी अशीच कडक भूमिका कायम ठेवावी, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली.

दरम्यान, शहरातील अनेक गणेश मंडळांनी पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देत ढोल-ताशा आणि ढोल-लेझीमच्या गजरात गणरायाची मिरवणूक काढली. पारंपरिक पद्धतीने निघालेल्या या मिरवणुकांचे नागरिकांनी उत्स्फूर्त स्वागत केले.

# भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या जयंती व अभियंता दिन उत्साहात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथे इंजिनिअर व बांधकाम ठेकेदार असोसिएशनच्या वतीने मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांची जयंती व अभियंता दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांचे कार्य देशातील अभियंत्यांना स्फूर्ती देणारे असल्याचे प्रतिपादन इंजिनियर सुनील वाघ यांनी यावेळी बोलतांना केले.

नेवासा तालुका इंजिनियर व बांधकाम ठेकेदार असोसिएशनच्या वतीने आयोजित जयंती व अभियंता दिन कार्यक्रमाप्रसंगी इंजिनिअर नगरसेवक सुनील वाघ यांच्या हस्ते भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण व आर के कन्ट्रक्शनचे राजेंद्र परदेशी यांनी इंजिनियर डे निमित्ताने अभियंत्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी व्यापारी राजेंद्र महाजन,कैलास परदेशी,मच्छिंद्र गव्हाणे,केशव कोबरणे, सूरज परदेशी, विशाल काकडे, अनिल सोनवणे, भिकन सोनवणे, शंकर इरले, गौरव मापारी, दादा पानसरे यांच्यासह बांधकाम कामगार उपस्थित होते.



# विरोधकांची पाकिटे बंद केल्याने साई ज्योतचा कळवळा : पवार

**अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साई बाबा एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटीच्या राजकारणात सध्या आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी चांगल्याच रंगल्या आहेत. साई ज्योतच्या मुद्द्यावरून विरोधकांनी केलेल्या टीकेनंतर सोसायटीचे चेअरमन विठ्ठल पवार यांनी अत्यंत आक्रमक शब्दात विरोधकांचा समाचार घेतला आहे .

चेअरमन पवार म्हणाले, ''विरोधकांची पाकिटं बंद झाल्याने त्यांचा जळफळाट झाला आहे. साई ज्योतच्या चुलीत पेटलेला धूर त्यांच्याच डोळ्यात गेल्यामुळे त्यांचे डोळे रात्रंदिवस एक दिसू लागले आहेत.'' त्यांनी सकाळी उठून त्यांचे डोळे आरशात पाहावे .

आपल्या कार्यकाळात सोसायटीतील गैरव्यवहारांना पूर्णपणे आळा घातल्याचा दावा करताना पवार म्हणाले, ''मी चेअरमन झाल्यानंतर विरोधकांच्या चोऱ्या पूर्णपणे बंद केल्या आहेत. यापूर्वी त्यांच्या हस्तकांमार्फत सोसायटीला निकृष्ट दर्जाचा माल पुरवला जात होता. मी तो माल स्पष्टपणे नाकारला. त्यामुळे त्यांची दुकानदारी बंद पडली आहे. आता त्यांच्याच हस्तकांचा माल सोसायटीने पुन्हा खरेदी करावा, यासाठीच त्यांना साई ज्योतचा एवढा पुळका आला आहे. हा साई ज्योतचा मुद्दा नाही, तर स्वतःच्या आर्थिक हितसंबंधाचा मुद्दा आहे.''



यावेळी विरोधकांच्या गुंतवणुकीवर गंभीर सवाल उपस्थित करत पवार यांनी थेट आव्हान दिले. ते म्हणाले, ''ग्रोमोर, सिस्पे यासारख्या कंपन्यांमध्ये तुम्ही कोणत्या पापाची कमाई गुंतवली आहे, हे आधी जनतेसमोर दाखवा. सोसायटीला लुटून मिळवलेल्या पैशातून केलेली ही गुंतवणूक आहे का, याचा हिशोब द्या.''

आपल्यावर कारभारात अडथळा आणल्याचा आरोप करणाऱ्या विरोधकांना त्यांनी पुढे सवाल केला, ''मी तुमची सत्ता असताना साई ज्योत ला आव्हाण केले तेव्हा मग तुम्ही चेअरमन असताना माझे काय वाकडे करू शकला नाहीत?''

विरोधकांकडे आता विरोध करण्यासाठी कोणताही ठोस मुद्दा शिल्लक नसल्याचा दावा करत पवार म्हणाले, ''ते ज्या ठिकाणी कार्यालय चालवतात, त्या कार्यालयाचे भाडे भरण्यासाठीही त्यांच्याकडे पैसे नाहीत. ही दयनीय परिस्थिती त्यांच्याच कार्यकर्त्यांनी माध्यमांसमोर सांगितली आहे.''

विरोधकांना इशारा देताना पवार म्हणाले, ''अजून वर्षभर थांबलात, तर तुम्हाला याच साई ज्योतसमोर हातात डबडं घेऊन फिरण्याची वेळ येईल. अशी वेळ तुमच्यावर येऊ नये यासाठी सर्वांनी संयम ठेवावा, कारण प्रत्येकाची वेळ येत असते.''

# न्यायालयीन कर्मचारी संपाच्या तयारीत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : 'समान काम-समान वेतन' यासह विविध मागण्यांसाठी महाराष्ट्रातील दुय्यम न्यायालयांतील न्यायालयीन कर्मचारी आंदोलनाच्या तयारीत आहेत. मागण्या मान्य न झाल्यास १७ नोव्हेंबर २०२६ पासून बेमुदत संप पुकारण्याचा इशारा औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कर्मचारी गट-क संघटनेचे अध्यक्ष विजयराव दांडगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालय व खंडपीठातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी लागू करावी, अशी मागणी महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाने केली आहे. महासंघाचे अध्यक्ष दिगंबर निकम यांनी मुख्य न्यायमूर्ती व महाप्रबंधकांकडे निवेदन दिले होते. हे निवेदन शासनाकडे पाठविण्यात आले असून, सुमारे दीड वर्षापासून प्रलंबित असल्याचे संघटनेने म्हटले आहे. आंदोलनाची सुरुवात १६ सप्टेंबरला एक दिवस काळी फीत लावून काम करण्याने होणार आहे. मागण्या मान्य न झाल्यास १६ व १७ ऑक्टोबरला काळी फीत लावून आंदोलन, ५ नोव्हेंबरला सामूहिक रजा घेऊन लाक्षणिक संप आणि त्यानंतर १७ नोव्हेंबरपासून बेमुदत संप पुकारण्यात येणार आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

## पान १ वरुन

### काठीचा धाक दाखवत चिमुकल्याला मारहाण!

घटनेनंतर पालकांनी संबंधित शिक्षकाकडे विचारणा केली; मात्र समाधानकारक उत्तर मिळाले नसल्याचा आरोप आहे. त्यानंतर शुक्रवारी (दि. १२) विद्यार्थ्याच्या आईने मुलाला सोबत घेऊन पाथर्डी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. तक्रारीच्या आधारे पोलिसांनी शिक्षकाविरुद्ध गुन्हा दाखल केला. प्रकाराची माहिती मिळताच ग्रामस्थांनी शाळेत जाऊन शिक्षकाकडे जाब विचारला. तसेच शिक्षण विभागाकडे निवेदन देऊन संबंधित शिक्षकावर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. घटनेचा पुढील तपास पोलिस नाईक धोत्रे करीत आहेत. शिक्षण विभागाच्या कारवाईकडे पालक व ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

### अकारी पडीत जमिनी वाटपाचा शासनाचा निर्णय

या प्रश्नाला न्यायालयीन लढ्याचीही जोड मिळाली. याचिकाकर्ते गिरीधर आसने यांनी २०१२ मध्ये यासंदर्भात याचिका दाखल केली होती. त्यानंतर जयदिप आसने यांनी अवमान याचिका दाखल करून न्यायालयीन पातळीवर पाठपुरावा सुरू ठेवला. त्याचबरोबर शासनस्तरावरही सातत्याने प्रयत्न सुरू होते. महायुती सरकार सत्तेवर आल्यानंतर तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी या प्रश्नाला विशेष प्राधान्य दिले. उच्च न्यायालयात सरकारची भूमिका मांडताना मूळ जमीनमालकांच्या वारसांना जमीन देण्यास शासनाचा विरोध नसल्याची भूमिका स्पष्ट करण्यात आली. पुढे हा विषय काही काळ रखडल्यानंतर विखे पाटील यांनी महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे खंडकरी शेतकऱ्यांचे शिष्टमंडळ नेऊन पुन्हा पाठपुरावा केला. दरम्यान, ॲड. अजित काळे यांनी अकारी पडीत शेतकऱ्यांच्या मागणीसाठी हरेगाव येथे आंदोलन व उपोषण केले होते. त्यावेळी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले होते. त्यानंतर मुख्यमंत्री, राज्यपाल आणि म हसूल विभागासह संबंधित पातळ्यांवर प्रश्न सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात आले.मंगळवारी मंत्रिमंडळाच्या बैठकीत जमिनी मूळ मालकांच्या वारसांना देण्याच्या निर्णयाला मंजुरी मिळाल्याची माहिती समोर येताच हरेगावसह अकारी पडीत क्षेत्रातील नऊ गावांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. अनेक ठिकाणी फटाके फोडून शेतकऱ्यांनी निर्णयाचे स्वागत केले.

या निर्णयाचे स्वागत करताना शेतकरी संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा अकारी पडीत शेतकरी संघटनेच्या न्यायालयीन लढ्याचे प्रमुख ॲड. अजित काळे यांनी या निर्णयाचे संपूर्ण श्रेय पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पाठपुराव्याला दिले. जमिनींच्या पुढील वाटपाची प्रक्रिया देखील विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. निर्णयानंतर शेतकऱ्यांनी संयम राखून पुढील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहनही त्यांनी केले. या निर्णयाचे भाजपा जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर, उपाध्यक्ष दीपक पटारे, गिरीधर आसने, डॉ. शंकर मुठे, महेंद्र पटारे, भाऊसाहेब बांद्रे यांच्यासह तालुक्यातील भाजपा कार्यकर्ते व शेतकरी प्रतिनिधींनी स्वागत केले.

### ट्रॅक्टरच्या चाकाखाली चिरडून चिमुकल्याचा मृत्यू

सचिन सुग्रीव मते हे सोमवारी शेतातील मका कुट्टीचे काम उरकून ट्रॅक्टर घेऊन घरी परतले होते. त्यांनी ट्रॅक्टर घराच्या अंगणात आणून लावला. याच वेळी लहानगा देवांश अंगणात खेळत होता. खेळता खेळता तो अचानक ट्रॅक्टरच्या जवळ कधी गेला, हे त्याच्या वडिलांच्या किंवा घरातील कोणाच्याही लक्षात आले नाही.ट्रॅक्टरच्या हालचाली दरम्यान देवांश नकळत ट्रॅक्टरच्या मागील चाकाखाली आला. चाकाखाली गंभीर चिरडल्या गेल्यामुळे त्याला जबर दुखापत झाली आणि त्याचा जागीच प्राण गेला.अपघाताची बातमी समजताच घरातील सदस्यांनी एकच आक्रोश केला. एका क्षणात आनंदाच्या वातावरणाचे रूपांतर तीव्र दुःखात झाले. ही हृदयद्रावक बातमी वाऱ्यासारखी पसरताच परिसरातील ग्रामस्थ, नातेवाईक आणि नागरिकांनी मते कुटुंबीयांच्या घरी तातडीने धाव घेतली.मते कुटुंबातील एकुलत्या एक चिमुकल्याचा असा अचानक आणि दुर्दैवी अंत झाल्याने मते कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी घडलेल्या या घटनेने संपूर्ण मतेवाडी परिसर सुन्न झाला असून सर्वत्र तीव्र शोक व्यक्त केला जात आहे.

### अवजड वाहतुकीच्या चक्राखाली आणखी एक जीव

अशा अपघातांकडे केवळ वाहतुकीची घटना म्हणून पाहता येणार नाही, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. हॉटेल जोशी परिसर ते जोर्वे नाका तसेच तीन बत्ती चौक ते दिल्ली नाका या मार्गावर यापूर्वीही अवजड वाहनांमुळे अपघात घडले आहेत. या मार्गावर दुचाकीस्वार, पादचारी, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांची मोठी वर्दळ असते. अरुंद रस्ते, वाहतूक कोंडी आणि त्यातून वाट काढत धावणारी मोठी वाहने यामुळे प्रत्येक क्षणी अपघाताची भीती निर्माण होते. सुमया तांबोळी यांच्या मृत्यूच्या घटनेनंतर नागरिक मोठ्या संख्येने एकत्र आले. त्यांच्या चेहऱ्यावर दुःख आणि संताप स्पष्ट दिसत होता. 'शहराला बाह्यवळण रस्ता असताना अवजड वाहने शहरातूनच का धावत आहेत?' असा सवाल त्यांनी उपस्थित केला. नागरिकांच्या या प्रश्नामागे केवळ संताप नाही, तर आपल्या कुटुंबातील एखादी व्यक्ती पुढची बळी ठरू नये, ही भीतीही आहे. अपघातानंतर घटनास्थळी बंदोबस्त करणे किंवा पंचनामा करण्यापुरती कारवाई न करता शहरातील अवजड वाहतुकीचे कायमस्वरूपी नियमन करावे, वाहनांसाठी वेळेचे निर्बंध लागू करावेत, आवश्यकतेनुसार वाहतूक मार्गात बदल करावा आणि धोकादायक ठिकाणी ठोस सुरक्षा उपाययोजना कराव्यात, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. दिल्ली नाक्यावर घडलेली ही घटना एका कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त करून गेली आहे. आता या मृत्यूतून प्रशासन काही धडा घेणार का, की आणखी एखाद्या कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळल्यानंतरच उपाययोजना होणार, असा सवाल संतप्त नागरिकांकडून केला जात आहे.

### जरांगेंचा मराठा जनसागर मुंबईकडे निघाला

यांच्या मुंबईतील आंदोलनाला परवानगी नाकारली असतानाही ते आपल्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळे मुंबईकडे निघालेल्या या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापले आहे.

जरांगे पाटील यांच्या मुंबईकडे जाणाऱ्या मोर्चाचा पहिला मुक्काम बीड जिल्ह्यातील पाटोदा येथे होणार आहे. त्यांच्या स्वागतासाठी पाटोदा तसेच मांजरसुंबा ते पाटोदा मार्गावर मोठी तयारी करण्यात आली आहे. या मार्गावर १४ मोठी अन्नछत्रे, तर पाटोदा शहरात ११ अन्नछत्रे उभारण्यात आली आहेत. तसेच वाहनांसाठी २५ ठिकाणी पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे.

जरांगे पाटील यांचा ताफा गेवराई परिसरात दाखल झाल्यानंतर मोठ्या संख्येने मराठा बांधव त्यांच्यासोबत सहभागी झाल्याचे दिसून आले. ताफ्याचे ड्रोनद्वारे टिपलेले दृश्य सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले आहे. रात्रीच्या वेळी गेवराईजवळील पाडळसिंगी टोल नाक्यावरही मोठ्या संख्येने मराठा बांधव जमा झाल्याचे दृश्य समोर आले.

### आता कल्पना पवारांच्या खांद्यावर 'खाकी'ची जबाबदारी!

पोलीस दलातील अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी नागरिकांच्या सुरक्षेसाठी आपले प्राण पणाला लावले. त्यात हुतात्मा अंबादास पवार यांचाही समावेश होता. पतीच्या वीरमरणानंतर कल्पना पवार यांच्या आयुष्यात मोठी पोकळी निर्माण झाली. एका बाजूला पतीच्या निधनाचे दुःख, तर दुसऱ्या बाजूला कुटुंबाची जबाबदारी आणि मुलाच्या भविष्याची चिंता, अशा कठीण परिस्थितीत त्यांनी खचून न जाता आयुष्याचा संघर्ष सुरू ठेवला. मुलाच्या शिक्षणाची जबाबदारी स्वीकारत त्यांनी त्याला घडविले. आज त्यांचा मुलगा बारावीचे शिक्षण घेत आहे. आईने प्रतिकूल परिस्थितीवर मात करून मिळविलेल्या या यशाचा त्याला निश्चितच अभिमान आहे. पोलीस उपअधीक्षक पदाची जबाबदारी सोपी नाही. त्यासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण कल्पना पवार यांनी नाशिक येथील महाराष्ट्र पोलीस अकादमीत पूर्ण केले. शिस्त, कायदा, नेतृत्व, शारीरिक क्षम ता आणि पोलीस प्रशासनाच्या विविध पैलूंचे प्रशिक्षण घेतल्यानंतर आता त्यांची प्रत्यक्ष कामकाजाच्या प्रशिक्षणासाठी श्रीरामपूर येथे नियुक्ती झाली आहे. श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात प्रशिक्षणार्थी पोलीस उपअधीक्षक म्हणून काम करताना त्यांना कायदा-सुव्यवस्था, गुन्हे प्रतिबंध, नागरिकांशी संवाद आणि पोलीस प्रशासनाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

# मुख्यालयी वास्तव्याची सक्ती करू नये
## मागणीसाठी शिक्षकांचे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर.** : ग्रामीण भागातील शिक्षकांना निवास व्यवस्था उपलब्ध करून दिल्याशिवाय मुख्यालयी वास्तव्याची सक्ती करू नये, या मागणीसाठी गंगापूर तालुक्यातील सर्व शिक्षक व संघटना एकत्र येऊन आक्रमक झाले असून आधी निवास, मग सक्ती'वर शिक्षक ठाम,शिक्षकांच्या न्याय्य हक्कांसाठी तालुक्यातील सर्व शिक्षक संघटनांनी एकत्र येत मंगळवार, १५ सप्टेंबर रोजी सामूहिक रजा घेऊन लासुर रोड पासून मोर्चा काढुण पंचायत समिती परिसरात धरणे आंदोलन करण्यात आले.



निवासाच्या समस्यांकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी व ग्रामीण भागातील अनेक शाळांच्या ठिकाणी शिक्षकांसाठी शासनाची स्वतंत्र निवासव्यवस्था उपलब्ध नसल्याने भाड्याने घर किंवा खोली मिळण्यापासून ते कुटुंबासह वास्तव्य करण्यापर्यंत पत्नी शिक्षकांची वेगवेगळ्या गावांत नियुक्ती, कुटुंबासाठी पुरेशी निवासाची सोय नसणे आणि उपलब्ध घरांची मर्यादित संख्या यामुळे मुख्यालयी राहण्याचा प्रश्न अधिक गुंतागुंतीचा बनला आहे अनेक अडचणी निर्माण होत असल्याचे संघटनांचे म्हणणे आहे.

शासनाने ग्रामीण भागातील शिक्षकांसाठी पुरेशी व सुरक्षित निवासव्यवस्था निर्माण करावी आणि त्यानंतरच मुख्यालयी वास्तव्याची सक्ती करावी, अशी स्पष्ट भूमिका समन्वय समितीने घेतली आहे. शिक्षकांना सुविधा न देता मुख्यालयाची सक्ती नको; आधी निवासव्यवस्था, मग अंमलबजावणी, या भूमिकेसाठी तालुक्यातील सर्व शिक्षकांनी १५ सप्टेंबरच्या आंदोलनात सामूहिक रजा घेऊन सहभागी झाले असून यावेळी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या शाळा बंद असल्याचे पाहायला मिळाले यावेळी आंदोलनात गंगापूर तालुक्यातील सर्व शिक्षक, शिक्षिका मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. गंगापुर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक सलीम चाऊस यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# द्रोणा अकॅडमीत लाडक्या विघ्नहर्ताचे उत्साहात आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील साकुरी येथील अशोकराव दामोधर दंडवते पाटील ग्रामीण शैक्षणिक प्रतिष्ठानच्या द्रोणा स्कूल व कॉलेजमध्ये लाडक्या विघ्नहर्ताचे मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात आगमन करण्यात आले. गणपती बाप्पाच्या आगमनाने संपूर्ण द्रोणा अकॅडमी परिसर आनंदमय व मंगलमय झाला. गणपतीचे आगमन गणपती बाप्पा मोरया मंगलमूर्ती मोरया या जयघोषाने झाला. द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते व संचालिका प्राजक्ताताई दंडवते यांच्या हस्ते श्री गणेशाची विधिवत पूजा व आरती करण्यात आली. यावेळी भक्तीगीते व गणेश वंदना सादर करून वातावरणात भक्तीमय निर्माण केला. गणेशोत्सवातून भारतीय संस्कृती, परंपरा, एकता, आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश यावेळी देण्यात आला. यावेळी द्रोणा अकॅडमीचे अध्यक्ष जयराज दंडवते, संचालिका प्राजक्ताताई दंडवते, उपाध्यक्ष अनुप दंडवते, प्राचार्या अनिता रोहोम, शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर सेवक उपस्थित होते.



# आश्वी बुद्रुक ग्रामपंचायतीकडून राजेंद्र कुदनर यांचा सत्कार



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** । सुमारे १८०० कोटी रुपयांच्या ठेवी असलेल्या जिल्ह्यातील अग्रगण्य 'अहिल्यानगर जिल्हा सहकारी प्राथमिक शिक्षक बँके'च्या संचालकपदी आश्वी बुद्रुक (ता. संगमनेर) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक राजेंद्र विठोबा कुदनर यांची निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वच स्तरातून कौतुक होत असून, आश्वी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.या सत्कार सोहळ्याप्रसंगी ग्रामपंचायतीचे मार्गदर्शक विजय हिंगे, संचालक गीताराम गायकवाड, सरपंच नामदेव शिंदे, उपसरपंच बाळासाहेब मदने, ज्येष्ठ ग्रामपंचायत सदस्य बबनराव शिंदे, भाऊसाहेब खेमनर, अनिल कंगणकर, संतोष ताजणे, अझरुद्दीन शेख, अविनाश गायकवाड, अभिजीत ताजणे, बाळासाहेब जऱ्हाड, अस्लम शेख, ग्रामपंचायत अधिकारी गौतम जानेकर, शिक्षक दत्तात्रेय वाकचौरे, अशोक बोर्डे, विजय केदारी, फारुख शेख, बाबासाहेब गंवादे, हौशीराम मेचकर, बाळासाहेब जाधव, विजय आवारी, सचिन अमोलिक, सीताराम बलमे, सुनील शिंदे, प्रशांत ताजणे आदि उपस्थित होते.

# वैजापूरमध्ये जुगार अड्ड्यावर छापा, नऊ जणांवर कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : शहरातील लाडगाव रोडवरील आर. आर. बारच्या वरच्या मजल्यावर सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर वैजापूर पोलिसांनी मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास छापा टाकून नऊ जणांवर कारवाई केली. या कारवाईत रोख रक्कम व मोबाईल असा एकूण १ लाख ६९ हजार ९१० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पोलिस उपअधीक्षक विनयसोनावणे यांना लाडगाव रोडवरील विनोद जाधव यांच्या इमारतीतील पहिल्या मजल्यावर काही जण पैशांची पैज लावून 'झन्ना-मन्ना' नावाचा जुगार खेळत असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांचे पथक तयार करून पंचांसह संबंधित ठिकाणी पाठविण्यात आले.मंगळवारी रात्री १२.२५ वाजण्याच्या सुमारास पोलिसांनी आर. आर. बारच्या पहिल्या मजल्यावरील बांधकाम सुरू असलेल्या खोलीवर अचानक छापा टाकला. यावेळी काही इसम पत्त्यांवर पैसे लावून 'झन्ना-मन्ना' जुगार खेळताना व खेळविताना आढळून आले. पोलिसांनी त्यांना जुगाराच्या साहित्यांसह ताब्यात घेतले.





या कारवाईत विनोद बालू जाधव (३२, रा. लाडगाव रोड), रवि उर्फ बंटी सुभाष बागुल (३१, रा. लाडगाव रोड), दीपक भाऊसाहेब मुळे (३९), राजू रामदास गायकवाड (३३), योगेश रमेश महंकाळे (३२), कमलेश रामसिंग राजपूत (३२, रा. लाडगाव रोड), योगेश केशव घंगाळे (३४, रा. रामगिरीनगर), अमोल विजय जाधव (२८) आणि अविनाश बद्रीनाथ गायकवाड (२०, रा. रोठे वस्ती, ता. वैजापूर) यांच्यावर कारवाई करण्यात आली.

या प्रकरणी पोलिस हवालदार कुलदीप नरवडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैजापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस हवालदार पडळकर, अविनाश भास्कर, गणेश गोरक्ष, रणजित चव्हाण, कुलदीप नरवडे तसेच सहकाऱ्यांनी ही कारवाई केली. प्रकरणाचा पुढील तपास पोलिस करीत आहेत.

## निधन

### तुकाराम नवले



**नेवासा** : नेवासा बुद्रुक येथील जुन्या पिढीतील जेष्ठ नेते तुकारामजी वामनराव नवले काका यांचे मंगळवारी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले.मृत्यूसमयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. तुकारामजी नवले यांच्या पश्चात अरुण,अशोक, वसंत,दत्ता, बाळासाहेब ही पाच मुले,मुलगी जयश्री संजय खर्डे,सूना नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे. तुकारामजी नवले काकांनी त्यांच्या कारकिर्दीत ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे संचालक,जिल्हा परिषद सदस्य,मुळा एज्युकेशन सोसायटीचे सचिव म्हणून काम पाहिले होते या पदांच्या माध्यमातून त्यांनी न्याय देण्याचा प्रयत्न केला समाजासाठी त्यांचे कार्य मोलाचे ठरले.जेष्ठ नेते स्वर्गीय मारुतराव घुले पाटील व माजी खासदार यशवंतराव गडाख यांचे कट्टर समर्थक म्हणून त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत काम केले.

### अनिल मुठे



**माळवाडगांवः** श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगांव येथील अनिल भास्कर मुठे (वय ४७) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात आई वडील, पत्नी तीन मुली एक मुलगा सुन नातवंडे असा परिवार आहे.

### बाबासाहेब सिनारे



**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील बाबासाहेब सुदाम सिनारे (वय ४०) यांचे नुकताच निधन झाले. त्यांच्या पश्चात, आजी, चुलते, वडील, आई, मुलगी, मुलगा, पत्नी, भाऊ, असा परिवार आहे. निंभेरे येथील कामगार पोलीस पाटील ज्ञानदेव सिनारे यांचे ते पुतणे होते व सामाजिक कार्यकर्ते किशोर सिनारे व प्रगतशील शेतकरी वसंत सिनारे यांचे ते भाऊ होते.

### अर्जुन भांड



**श्रीरामपूरः** तालुक्यातील विठ्ठलवाडी (लाडगाव)येथील सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक अर्जुनराव लक्ष्मणराव भांड (वय - ७१) यांचे सोमवार (दि.१४) रोजी पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सुना , नातंवडे, तीन बंधु, दोन बहिणी, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे. पुणताब्याचे शिवाजीराव व प्रतापराव रामराव बोर्डे यांचे ते जावई तर संपत, संभाजी व अच्युत भांड यांचे ते धाकटे बंधू होत.

# 'केमिकलमुक्त' मशरूमनिर्मिती उत्पादनाचा देवगड येथे शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील उस्थळ खालसा येथील गोदातीर उद्योग समूहाचे प्रमुख व कृषी स्तंभलेखक तथा युवा उद्योजक बाळासाहेब पवार पाटील यांच्या फार्म हाऊसमध्ये तयार करण्यात आलेल्या 'केमिकलमुक्त', नैसर्गिक व प्रथिनयुक्त ताज्या मशरूम उत्पादनाचे संत महंतांना वाटप करून या उद्योगाचा शुभारंभ देवगड येथे संत-महंतांच्या हस्ते व आशीर्वादाने करण्यात आला.



गुरुवारी गुरुवर्य भास्करगिरी महाराज, ह.भ.प. प्रकाशानंदगिरी महाराज, महंत ऋषीनाथगिरी महाराज तसेच बहिरा जातवेद देवस्थान, विश्वनाथगिरी महाराज यांच्या हस्ते मशरूम वाटपाचा शुभारंभ झाला.

आधुनिक शेतीला उद्योगाची जोड देत आरोग्यदायी व नैसर्गिक अन्ननिर्मितीचा उपक्रम बाळासाहेब पवार पाटील यांनी हाती घेतला आहे. त्यांच्या फार्महाऊस मध्ये उत्पादित करण्यात आलेले ताजे मशरूम हे रसायनमुक्त असून त्यामध्ये मोठ्या प्रमाणात प्रथिने असल्याने आरोग्याच्या दृष्टीनेही त्याचे महत्त्व आहे. यावेळी गुरुवर्य भास्करगिरी महाराज यांच्यासह उपस्थित सर्व संत-महंत, देवगड भक्त परिवारातील सदस्य तसेच मित्र परिवाराने बाळासाहेब पवार पाटील यांच्या गोदातीर उद्योग समूहाच्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक करून त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. शेतीमध्ये नवनवीन प्रयोग करून उत्पादनाला उद्योगाची जोड देणाऱ्या या उपक्रमामुळे परिसरातील युवा शेतकरी व उद्योजकांसमोर नवी दिशा निर्माण झाली आहे.

# पशुधन विमा योजनेसाठी अर्ज मागविण्यास सुरुवात

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : राज्यभरातील पशुपालकांच्या पशुधनाला विविध आजार, अपघात व नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण देण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत (छडच्) 'पशुधन विमा योजना' राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेसाठी शेतकरी-पशुपालक बांधवांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु असून शेतकरी-पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.पशुधन विमा योजनेमुळे पूर, वीज पडणे, अपघात आणि विषबाधा, तसेच पशुधनाचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास पशुधन गमावणाऱ्या पात्र पशुपालक, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. या योजनेअंतर्गत विमा हप्त्याची ८५ टक्के रक्कम केंद्र व राज्य शासन (६०:४० प्रमाणात) भरणार असून, लाभार्थी पशुपालकाला केवळ १५ टक्के हिस्सा द्यावा लागेल. राज्यभरात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी निविदा प्रक्रियेद्वरे 'ॲग्रीकल्चर इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया लि.' (अखउ) ची निवड करण्यात आली आहे. विमा प्रीमियमचे १ वर्षासाठी ४.३० टक्के, २ वर्षांसाठी ७.५० टक्के आणि ३ वर्षांसाठी १०.५० टक्के असे दर निश्चित करण्यात आले आहेत.

**विमा संरक्षणाची मर्यादा व निकष:**

एका कुटुंबातील कमाल १० पशुधनासाठी अनुदानाचा लाभ मिळेल. दुभत्या गाईस कमाल मूल्य ७० हजार रुपये पर्यंत संरक्षण, दुभती म्हैस कमाल मूल्य ८० हजार रुपये पर्यंत संरक्षण, बैल , रेडे अनुक्रमे ७० हजार आणि ८० हजार रुपये पर्यंत संरक्षण, ेळी व मेंढी कमाल मूल्य ७ हजार रुपये प्रति जनावर याप्रमाणे राहील.

# कर्ज थकबाकीमुळे शिवराई सोसायटीचे अध्यक्ष अपात्र

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : तालुक्यातील शिवराई विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्ष सारंगधर वामन डिके यांना कर्ज थकबाकीमुळे अध्यक्ष व संचालक पदावरून अपात्र ठरविण्यात आले आहे. सहाय्यक निबंधक के.एम. चौधरी यांनी हा निकाल दिला.

डिके यांनी ५ मार्च २०२२ रोजी सोसायटीकडून ९६ हजार ६०० रुपयांचे पीक कर्ज घेतले होते. हे कर्ज एका वर्षाच्या मुदतीत व्याजासह फेडणे आवश्यक होते. मात्र, त्यांनी कर्जाची परतफेड मुदतीनंतर १० दिवसांनी केली. त्यामुळे ते संस्थेचे थकबाकीदार ठरले.

डिके हे थकबाकीदार असल्याने त्यांना अध्यक्ष व संचालक पदावरून अपात्र ठरविण्यात यावे, अशी तक्रार नानासाहेब बबनराव चव्हाण यांनी सहाय्यक निबंधकांकडे केली होती. सहकार अधिनियमातील तरतुदींनुसार थकबाकीदार सभासदांना संस्थेच्या पदावर राहण्यास अपात्र ठरविले जाते. त्यानुसार चौधरी यांनी डिके यांच्याविरुद्ध निर्णय दिला. डिसेंबर २०२२ मध्ये डिके यांची शिवराई सोसायटीच्या अध्यक्षपदी निवड झाली होती.

ते वैजापूर तालुक्यातील राजकारणात सक्रिय असून, त्यांच्या पत्नी पंचायत समितीच्या माजी सभापती आहेत. तसेच डिके हे जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालकही होते. केवळ दहा दिवसांच्या कर्ज थकबाकीमुळे पद गमावण्याची नामुष्की त्यांच्यावर ओढवली आहे.

# शिर्डीत कॅन्सरग्रस्तांसाठी आशेचा किरण
## साईनाथमध्ये साडेसहा कोटींचे मोफत किमोथेरपी सेंटर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : साईबाबा संस्थानच्या साईनाथ रुग्णालयात कॅन्सरग्रस्त रुग्णांना स्थानिक पातळीवरच मोफत उपचार मिळावेत यासाठी ३१ खाटांचे अत्याधुनिक कॅन्सर डे-केअर सेंटर सुरू करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. लोकमत न्यूज नेटवर्कच्या वृत्तानुसार तदर्थ समितीने जून महिन्यात झालेल्या बैठकीत या प्रकल्पासाठी साडेसहा कोटी रुपयांच्या खर्चाच्या प्रस्तावाला मंजुरी दिली असून उच्च न्यायालयाची अनुमती मिळाल्यानंतर आगामी दोन महिन्यांत हे युनिट प्रत्यक्षात सुरू होणार आहे.

या ३१ खाटांच्या डे-केअर सेंटरमध्ये २ व्हेंटिलेटर, १६ इलेक्ट्रिक फाउलर बेड, १५ इलेक्ट्रिक किमोथेरपी चेअर्स, बायोसेफ्टी कॅबिनेट, सिरिंज पंप आणि मॉनिटर्स अशी अत्याधुनिक यंत्रसामग्री उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तर उपचारासाठी १ मेडिकल ऑन्कोलॉजिस्ट, ४ आरएमओ, २४ ऑन्कोलॉजी नर्सेस, फार्मासिस्ट, कौन्सिलर आणि इतर कर्मचारी असे एकूण ४७ जणांचे मनुष्यबळ टप्प्याटप्प्याने तैनात केले जाणार आहे.सध्या साईनाथ रुग्णालयात दररोज सुमारे ११०० रुग्ण ओपीडीसाठी येतात. दर शनिवारी ऑन्कोलॉजिस्ट डॉ. मुकुल घारोटे रुग्णांची तपासणी करतात, मात्र किमोथेरपी किंवा रेडिओथेरपीची सुविधा उपलब्ध नसल्याने रुग्णांना पुढील उपचारासाठी मुंबई, पुणे किंवा इतर मोठ्या शहरांमध्ये रेफर करावे लागत होते. हे नवीन सेंटर सुरू झाल्यानंतर रुग्णांची ही गैरसोय दूर होऊन त्यांची मोठी सोय होणार आहे.कर्करोगाचे वाढते प्रमाण लक्षात घेता सर्व



जिल्हा रुग्णालयांमध्ये डे-केअर सेंटर स्थापन करण्याच्या शासनाच्या धोरणांतर्गत शिर्डी संस्थानला एल-३ स्तराचे कॅन्सर सेंटर मंजूर झाले आहे. यासाठी लागणारा बांधकाम, यंत्रसामग्री आणि मनुष्यबळाचा संपूर्ण खर्च संस्थानामार्फत केला जाणार असल्याची माहिती वैद्यकीय संचालक डॉ. प्रीतम वडगावे आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. मैथिली पितांबरे यांनी दिली आहे. रुग्णांची वाढती संख्या आणि त्यांची मागणी विचारात घेऊन संस्थानच्या तदर्थ समितीचे अध्यक्ष तथा जिल्हा प्रधान न्यायाधीश एस. बी. कचरे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया आणि सीईओ गोरक्ष गाडीलकर यांनी हा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

# दुष्काळ जाहीर करा, नाहीतर महामार्ग रोखू!

## बैलगाडी-पोतराजासह शेतकऱ्यांचा तहसीलवर आक्रोश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** पावसाअभावी खरीप पिके करपली, शेतकरी हवालदिल झाला; मात्र शासनाच्या दुष्काळ घोषणेची प्रतीक्षा कायम आहे. या पार्श्वभूमीवर मांडवगण जिल्हा परिषद गटासह संपूर्ण श्रीगोंदा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करा, या मागणीसाठी संभाजी ब्रिगेडच्या वतीने मंगळवारी पंचायत समिती ते तहसील कार्यालय असा शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. बैलगाडी आणि पोतराजाच्या पारंपरिक सादरीकरणातून शासनाच्या कारभारावर निशाणा साधत शेतकऱ्यांनी जोरदार घोषणाबाजी केली.

मोर्चानंतर तहसील कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. पाणी, चारा, आर्थिक मदत आणि पीक नुकसानभरपाईचा तातडीने निर्णय घ्या, अशी मागणी आंदोलकांनी केली. माणसे व जनावरांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, चारा छावण्या, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक कर्जवसुलीला स्थगिती, विद्यार्थ्यांना फी सवलत आणि शेतीसाठी नियमित वीजपुरवठा करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

**शेतकऱ्यांच्या प्रमुख मागण्या**

- मांडवगणसह संपूर्ण श्रीगोंदा तालुका कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करावा.
- माणसे व जनावरांसाठी तातडीने पिण्याचे पाणी उपलब्ध करावे.
- चारा छावण्या सुरू कराव्यात.
- नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत व पीक नुकसानभरपाई द्यावी.
- पीक कर्जवसुलीला स्थगिती द्यावी.
- विद्यार्थ्यांना फी सवलत द्यावी.
- तलाव दुरुस्ती, खोलीकरण व जलसंधारणासाठी विशेष निधी द्यावा.
- दुष्काळाची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत.
- शेतीसाठी नियमित वीजपुरवठा करावा.




**'आठ दिवसांत निर्णय घ्या; अन्यथा मांडवगणमध्ये रस्ता रोको!'**

संभाजी ब्रिगेडचे अहिल्यानगर जिल्हा संपर्क प्रमुख इंजि. शामभाऊ जरे यांनी प्रशासनाला थेट इशारा दिला. आठ दिवसांच्या आत कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. अन्यथा नगर-सोलापूर महामार्गावरील मांडवगण येथे शेतकरी रस्ता रोको आंदोलन करतील. त्यानंतरच्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी शासन व प्रशासनाची राहील, असा इशारा त्यांनी दिला.

दुष्काळाची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे करावेत, नुकसानभरपाई द्यावी, जलसंधारणाची कामे, तलाव दुरुस्ती व खोलीकरणासाठी विशेष निधी द्यावा आणि पाणीगळती रोखण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही आंदोलकांनी केली.

**बैलगाडी-पोतराजाने वेधले लक्ष**

आंदोलनात बैलगाडीचा सहभाग आणि पोतराजाचे पारंपरिक सादरीकरण हे विशेष आकर्षण ठरले. शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पारंपरिक प्रतीकांचा वापर करत आंदोलकांनी प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. मोठ्या संख्येने शेतकरी मोर्चात सहभागी झाले. दिलीप आबा वाळुंज, उत्तम मामा घोगरे, दिलीपराव लबडे, बापू उर्फ प्रफुल्ल जगताप, राम घोडके, रवींद्र महांडुळे, संतोष आरडे (मेजर), अक्षय दहातोंडे, नंदू काका दरेकर, गणेश महांडुळे, घनशाम काळे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी आंदोलनात सहभागी झाले.आता प्रशासनाच्या निर्णयाकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले असून, आठ दिवसांत दुष्काळ जाहीर न झाल्यास मांडवगण येथे महामार्ग रोखण्याच्या इशाऱ्यामुळे प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे.

---

# दखल

## हातगावात सरकारी जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांना ग्रामपंचायतीच्या नोटीसा

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील हातगाव गावठाणातर्गत महसूल व ग्रामपंचायत रेकॉर्डप्रमाणे नोंद असलेल्या सरकारी जागेवर गावातीलच काही नागरिकांनी अतिक्रमण केले असून ते करण्यात आलेले अतिक्रमण चुकीचे असून गावठाणाअंतर्गत ज्या - ज्या नागरिकांनी अतिक्रमण करून कच्चे व पक्के बांधकाम केलेले आहे अशा नागरिकांना अतिक्रमण हटवण्यासाठीच्या नोटीसा नुकत्याच बजावण्यात आल्या असल्याबाबतची माहिती ग्रामपंचायत कार्यालयाकडून समजली आहे. तालुक्यात लोकसंख्येने मोठे गाव असलेल्या हातगाव गावाअंतर्गत येणाऱ्या गावठाणामध्ये जिल्हाधिकारी व ग्रामपंचायतीचे नावाने अनेक मिळकत नंबर महसुली व ग्रामपंचायत दप्तरी नोंदले गेलेले असून गावातील असंख्य नागरिकांनी कुणाचीही व कोणतीही रीतसर परवानगी न घेता अनेक ठिकाणी अतिक्रमण केलेले असून परवानगी न घेता सरकारी जागेत अतिक्रमण करणे हा कायदेशीर गुन्हा ठरत असून चुकीचे असल्याने रेकॉर्डप्रमाणे ज्या - ज्या नागरिकांनी अतिक्रमण केलेले आहे अशा असंख्य ग्रामस्थांना ग्रामपंचायतीने वरिष्ठांच्या आदेशानुसार मार्गदर्शन घेऊन रीतसर नोटीसा बजावल्या असल्याने अतिक्रमण करणाऱ्या नागरिकांची मोठ्या प्रमाणात धावपळ सुरू झाली असल्याचे दिसून येत असून ज्यांना - ज्यांना नोटीसा मिळालेल्या आहेत त्या सर्व अतिक्रमणधारांना आपण केलेले अतिक्रमण नोटीसमधे नमूद केलेल्या मुदतीत हटवावे असेही अतिक्रमणधारकांना दिलेल्या नोटीसात ग्रामपंचायतीने कळवलेले आहे.

## मशागत बियाणे-खतापासून बाजारभावापर्यंत शेतकऱ्यांची ससेहोलपट!

**श्रीगोंदा :** शेतीसाठी सुरवातीला मशागत नंतर बियाणे घेताना संघर्ष, खतांसाठी धावपळ, उभी पिके वाचवताना विजेचा खेळखंडोबा आणि बाजारात माल नेल्यानंतर अपेक्षित भावाचा अभाव... शेतकऱ्याच्या वाट्याला संकटांची मालिका काही संपता संपत नाही. श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात दुष्काळाच्या झळा तीव्र होत असतानाच अनियमित वीजपुरवठ्यामुळे शेतकरी अक्षरशः मेटाकुटीला आला आहे. श्रीगोंदा तालुक्यातील ग्रामीण भागात एक तासही मोटार सुरळीत चालत नसल्याने पिकांना पाणी द्यायचे कसे? असा संतप्त सवाल शेतकरी उपस्थित करीत आहेत. पावसाअभावी आधीच पिके धोक्यात असताना उपलब्ध पाण्यावर अवलंबून असलेली शेतीही विजेच्या लपंडावामुळे संकटात सापडली आहे. बियाणे-खत महाग, वीज अनियमित, पाऊस बेभरवशाचा आणि बाजारभाव अपुरा; मग शेतकऱ्याने जगायचे तरी कसे? असा सवाल ग्रामीण भागातून उपस्थित होत आहे.संकटांच्या या चक्रव्यूहातही शेतकरी मात्र हार मानत नाही. निसर्गाच्या लहरीपणाशी दोन हात करत तो पुन्हा पेरणी करतो, पुन्हा पीक उभे करतो आणि पुन्हा बाजाराच्या आशेवर जगतो. म्हणूनच तो बळीराजा!मात्र आता आश्वासनांपेक्षा नियमित वीजपुरवठा, दुष्काळी मदत आणि शेतमालाला योग्य बाजारभाव देण्यासाठी शासनाने ठोस निर्णय घेण्याची गरज निर्माण झाली आहे.त्यामुळे शेतकऱ्यांना वाली नसल्याचे चित्र पाहण्यास मिळत आहे मात्र जगाचा पोशिंदा उपाशी असल्याचे चित्र तालुक्यात पाहण्यास मिळत आहे.

## अहिल्यानगरमध्ये २७ सप्टेंबरला 'वैशाली सरडे स्मृती' लघुनाटिका स्किट स्पर्धेचे आयोजन

**अहिल्यानगर :** होशी प्रायोगिक कलावंत संघ, अहिल्यानगर शाखेच्या वतीने 'वैशाली सरडे स्मृती लघुनाटिका (स्किट) स्पर्धा २०२६' चे आयोजन रविवार, २७ सप्टेंबर २०२६ रोजी करण्यात आले आहे. ही स्पर्धा जिल्हा वाचनालय सभागृह, सावेडी शाखा, एलआयसी कॉलनी, गंगा उद्यानाजवळ, जॉगिंग ट्रॅक शेजारी, सावेडी, अहिल्यानगर येथे होणार आहे. स्पर्धा सर्व वयोगटातील स्पर्धकांसाठी खुली असून प्रत्येक संघात किमान २ आणि कमाल ४ कलाकार असणे आवश्यक आहे. स्किटचे सादरीकरण मराठी भाषेत करावे लागणार असून प्रत्येक संघाला किमान १० व कमाल १५ मिनिटांचा वेळ दिला जाणार आहे. स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देण्यात येणार असून प्रथम क्रमांकासाठी ५,००० रुपये, द्वितीय क्रमांकासाठी ३,००० रुपये, तृतीय क्रमांकासाठी २,००० रुपये आणि दोन उत्तेजनार्थ बक्षिसे प्रत्येकी १,००० रुपये देण्यात येतील. तसेच सर्व सहभागी स्पर्धकांना सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र आणि सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. स्पर्धेची प्रवेश फी २०० रुपये असून पहिल्या २० अर्जांना प्राधान्य दिले जाणार आहे. स्पर्धेसाठी आवश्यक नेपथ्य, वेशभूषा व प्रॉप्स स्पर्धकांनी स्वतः आणावेत. अश्लील, असभ्य, जातीय किंवा धार्मिक तेढ निर्माण करणारे अथवा कोणत्याही व्यक्ती, समाज किंवा समुदायाचा अपमान करणारे सादरीकरण स्वीकारले जाणार नाही.

## अभियंत्यांनी विकासकामांच्या गुणवत्तेसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावेत: आनंद भंडारी




**अहिल्यानगर :** पायाभूत सुविधांची निर्मिती करताना गुणवत्ता राखणे महत्त्वाचे असते. काम दर्जेदार नाही झाले तर लोकांचा रोष निर्माण होतो. त्यामुळे कामाचा दर्जा व गुणवत्ता राखण्यासाठी अभियंत्यांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. तसेच आताच्या आधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करून आपले काम अधिक प्रभावी होईल यासाठी प्रयत्न करावेत. जग सतत बदलत असून काळानुरूप बदल अंगिकारले तर निश्चितच नवनवीन आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाता येते. मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांनी देशाच्या सिंचन व्यवस्थेच्या निर्माणात अतुलनीय योगदान दिले. पायाभूत सुविधांच्या निर्मितीत अभियंत्यांचे मोठे योगदान असते. देशाच्या आतापर्यंतच्या प्रगतीत अभियंत्यांचे महत्त्वपूर्ण आहे, असे प्रतिपादन अहिल्या नगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी केले. भारतरत्न मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांची जयंतीनिमित्त देशभरात १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिन साजरा केला जातो. यानिमित्त जिल्हा परिषद अभियंता संघटनेच्या वतीने आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट अभियंता पुरस्कार वितरण कार्यक्रम झाला. जिल्हा परिषद सभागृहात झालेल्या या कार्यक्रमास मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शैलेश मोरे, कार्यकारी अभियंता सिद्धार्थ वाहूळे,राज्याध्यक्ष सचिन चव्हाण, मुख्य सल्लागार सुहास धारासूरकर, जिल्हा परिषद अभियंता संघटनेचे अध्यक्ष राजू दीघे, जिल्हा सचिव अभिमन्यू क्षीरसागर, राज्य उपाध्यक्ष मयुर मुनोत,गणेश सवाई, रवींद्र गिते, सचिन दिनकर, महेश पालवे, शैलेंद्र पांढरे, शिवाजी महांडुळे आदी उपस्थित होते. प्रास्ताविकात अभिमन्यू क्षीरसागर यांनी सांगितले की, जिल्हा परिषद अभियंता संघटनेने उत्कृष्ट अभियंता पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे नियोजन केले व त्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पाठबळ दिले. पुरस्कार न मिळालेल्यांनाही अशा कार्यक्रमातून प्रेरणा मिळते. संघटनेने आयोजित केलेल्या रक्तदान शिबिरालाही अभियंत्यांनी चांगला प्रतिसाद देत रक्तदानाचे पवित्र कार्य केले. संघटनेने जिल्हा अध्यक्ष राजू दीघे यांनी आभार मानले.

---

# देशाच्या जडणघडणीत अभियंत्यांचा मोठा वाटा : गाडे

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त साजरा करण्यात येणाऱ्या अभियंता दिनाचे औचित्य साधून उपमहापौर ड. धनंजय जाधव यांच्या वतीने अहिल्यानगर महापालिकेतील अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. महापौर ज्योतीताई गाडे व महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या हस्ते अभियंत्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर, नगरसेवक मनोज दुल्लम, महेश लोंढे, पुष्कर कुलकर्णी, रोहन सानप यांच्यासह सत्कारमूर्ती अभियंते मनोज पारखे, सुरेश इथापे, श्रीकांत निंबाळकर, वैभव जोशी, अश्विनी जाधव, जितेंद्र शेळके, खलील पठाण, आदित्य बल्लाळ, गणेश गाडळकर, अंजली गदादे, भक्ती बेल्हेकर, निकिता गोरे, राजेंद्र मेहत्रे, सुजित कोके, रामदास साळी, निलेश पेटेकर, शुभम पवार, सर्वार्थ मुदगल, राहुल गीते, प्रदीप ढगे, अनिकेत केकाण आदी अभियंते उपस्थित होते.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त देशभरात अभियंता दिन साजरा केला जातो. जलव्यवस्थापन, सिंचन, धरणे आणि औद्योगिक विकासाच्या क्षेत्रात सर विश्वेश्वरय्या यांनी केलेले कार्य आजही सर्वांसाठी ऊर्जा व प्रेरणादायी आहे. देशाच्या जडणघडणीमध्ये अभियंत्यांचा मोठा वाटा असून शहर विकासामध्येही अभियंत्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. महापालिकेमध्ये अभियंत्यांची संख्या कमी असली, तरी उपलब्ध अभियंते रस्ते, पूल, पाणीपुरवठा, जलनिस्सारण व्यवस्थापन, पथदिवे, उद्याने, सार्वजनिक इमारती तसेच विविध नागरी सुविधांच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष अंमलबजावणीपर्यंत महत्त्वाची जबाबदारी पार पाडत आहेत. अभियंता दिनानिमित्त महापालिकेच्या वतीने सर्व अभियंत्यांना शुभेच्छा देत असल्याचे महापौर ज्योतीताई गाडे यांनी सांगितले. महापालिका आयुक्त यशवंत डांगे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या सहकाऱ्यांनी दूरदृष्टी आणि नियोजनबद्ध पद्धतीने अभेद्य किल्ल्यांची निर्मिती केली. आजही या वास्तू आपल्याला पाहायला मिळतात. छत्रपती शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीचा तसेच भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या कार्याचा आदर्श अभियंत्यांनी अंगीकारावा.

# अभियंत्यांच्या हस्ते भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने राष्ट्रीय अभियंता दिन वृक्षारोपण करून सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमाने साजरा करण्यात आला. भिंगार येथील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये अभियंता दिनाचे औचित्य साधून अभियंत्यांच्या हस्ते विविध रोपांची लागवड करण्यात आली. सामाजिक बांधिलकीसोबत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला ग्रुपच्या सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

या वेळी इंजि. नागेश खुरपे व इंजि. अनिलराव सोळसे यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून भिंगार परिसरातील भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कच्या स्वच्छता, वृक्षसंवर्धन व पर्यावरण रक्षणासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. परिसर स्वच्छ ठेवण्यासोबतच मोठ्या प्रमाणात झाडांची निगा राखण्याचे काम ग्रुपचे सदस्य सातत्याने करत आहेत. त्यामुळे जॉगिंग पार्क हे नागरिकांसाठी आरोग्यदायी व हिरवाईने नटलेले ठिकाण म्हणून विकसित होत आहे.

यावेळी हरदिन मॉर्निंग ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, ताराचंद ठोकळ, अशोक पराते, सर्वेश सपकाळ, जहीर सय्यद, दिलीप ठोकळ, अशोक लोंढे, रूपालीताई खुरपे, सविताताई परदेशी, प्रांजली सपकाळ, प्रवीण परदेशी, विलास आहेर, सुंदरराव पाटील, सखाराम अळकुटे, योगेश चौधरी, अभिजीत सपकाळ, सुभाषराव पेंढुरकर, मुन्ना वाघस्कर, अविनाश जाधव, सुधीर कपाळे, सरदारसिंग परदेशी, जोगिंदरसिंग, उमाशंकरसिंग, दिपकराव घोडके, तुषार घाडगे, आजेशे पुरी आदी उपस्थित होते.

# नोकरीपेक्षा उद्योग-व्यवसायाच्या संधींकडे महिलांनी वळावे : तांदळे



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महिला व युवतींना विविध व्यावसायिक कौशल्यांचे प्रशिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याच्या उद्देशाने भारत सरकारच्या कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय (नवी दिल्ली) संचलित जन शिक्षण संस्थेच्या वतीने क्षमता बांधणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील जन शिक्षण संस्थेत झालेल्या या कार्यक्रमात महिला प्रशिक्षिका व शिक्षिकांना विविध व्यावसायिक प्रशिक्षणाबरोबरच मार्केटिंग, बाजारपेठेची उपलब्धता, उद्योग-व्यवसायासाठी आवश्यक असलेले बीज भांडवल, शासकीय योजना, कर्ज प्रक्रिया आणि उद्योजकता विकास याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी प्रशिक्षणार्थी युवती व महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी जन शिक्षण संस्थेचे नूतन संचालक अनिल तांदळे, कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत, मनीषा शिंपी, अनुष्का वारे, नीलिमा बल्लाळ, अमर अग्रवाल आदी उपस्थित होते. प्रास्ताविक करताना कार्यक्रम अधिकारी सय्यद शफाकत यांनी जन शिक्षण संस्थेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणासाठी सुरू असलेल्या विविध उपक्रम व प्रकल्पांची माहिती दिली.

# विजय शेळके प्रकरणावरून श्रीगोंद्यात सर्वपक्षीय एल्गार!

## प्रतीक पाचपुते हा मोहरा असल्याचा राहुल जगतापांचा आरोप

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**श्रीगोंदा :** शेतकरी विजय शेळके यांना कथितरीत्या मारहाण करून मानवी मूत्र पाजल्याच्या आरोपांनी श्रीगोंदा तालुक्यात संतापाचे वातावरण निर्माण झाले असून, या प्रकरणाच्या निषेधार्थ तहसील कार्यालयावर सर्वपक्षीय भव्य मोर्चा काढण्यात आला. मोर्चानंतर झालेल्या जाहीर सभेत शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट, माजी आमदार राहुल जगताप यांच्यासह विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी व व्यापाऱ्यांनी प्रशासनाच्या भूमिकेवर सवाल उपस्थित केले.

राज्याचे माजी मंत्री 'बबनराव पाचपुते यांच्या काळात श्रीगोंद्यात असे कधीच झाले नाही,' असा थेट आरोप माजी आमदार राहुल जगताप यांनी केला. श्रीगोंद्यात दूध भेसळीचे प्रकार वाढले असून, कथित बेकायदेशीर धंद्यांमध्ये प्रतीक पाचपुते हा केवळ मोहरा असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**'गोरक्षकांच्या विरोधात आंदोलन करणे धाडसाचे काम'**

शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अनिल घनवट यांनी कथित गोरक्षकांच्या कारवायांवर जोरदार टीका केली. गोरक्षकांच्या विरोधात आंदोलन करणे हे धाडसाचे काम असल्याचे सांगत त्यांनी गोवंश कायद्याच्या अंमलबजावणीच्या पद्धतीवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले.गावरान गाईंची संख्या वाढावी यासाठी कायद्यात बदल करण्यात आला; मात्र २०१९ च्या सर्वेक्षणात जनावरांची संख्या कमी झाल्याचे सांगत, त्यानंतर कथित गोरक्षकांची संख्या वाढली असल्याचा दावा घनवट यांनी केला. या कायद्याला पाठिंबा देणाऱ्या पक्षांना मतदान करू नये, असे आवाहन करण्याची भूमिकाही त्यांनी मांडली.

**पांजरपोळमधील जनावरांचा हिशेब द्या!**

श्रीगोंदा तालुक्यातील पांजरपोळांचीही चौकशी करण्यात यावी, अशी सर्वपक्षीय मागणी मोर्चातून करण्यात आली. पोलिसांच्या कारवाईत ताब्यात घेतलेल्या जनावरांचे पुढे काय झाले? पांजरपोळमध्ये दाखल केलेली जनावरे सुरक्षित आहेत का, बेपत्ता झाली का अथवा विकली गेली का, याचा रेकॉर्ड तपासून संपूर्ण हिशेब जनतेसमोर आणावा, अशी मागणी करण्यात आली.याशिवाय गुटखा तस्करीसाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनांची तपासणी करून ती जप्त करणे, कथित बोगस आधार केंद्रांची चौकशी करणे, तसेच संबंधित व्यक्तींवर दोष सिद्ध झाल्यास मोक्का व हद्दपारीसारखी कठोर कारवाई करणे, अशा मागण्या मोर्चेकऱ्यांनी केल्या. मोर्चात माजी आ. राहुल जगताप, अनिल घनवट, सागर खोत, मुकुंद सोनटक्के, राजेंद्र म्हस्के, अख्तर शेख, अनिल औटी, रविराज साबळे, भैय्या वाबळे, ॲड. समित बोरुडे, अरविंद कापसे यांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, शेतकरी व व्यापारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.

# कर्जत नगरपंचायतीमध्ये दलितवस्तीच्या निधीत गैरव्यवहार!

## संतप्त आंदोलकांनी नगराध्यक्षासह मुख्याधिकाऱ्याच्या खुर्चीला घातला चपलाचा हार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** प्रशासनाने सर्व नियमांची पायमल्ली करून कर्जत नगरपंचायतीमधील दलित वस्तीच्या निधीचा उघड गैरवापर केला आहे. याच प्रश्नावर अपात्र ठरलेले नगरसेवक भास्कर भैलुमे यांनी मंगळवारी पदाधिकारी-प्रशासनाच्या गैरव्यवहाराच्या विरोधात नगराध्यक्ष व मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला चपलाचा हार घालत हलगी बजाव आंदोलन केले.

शासकीय नियमांनुसार दलित वस्तीचा निधी राखीव प्रभाग सोडून इतरत्र खर्च करायचा असल्यास ५० टक्क्यांपेक्षा जास्त मागासवर्गीय लोकसंख्या असलेल्या प्रभागांमध्ये उतरत्या क्रमाने निधी खर्च करणे बंधनकारक आहे. मात्र कर्जत नगरपंचायतीने सामाजिक न्याय विभागाच्या या शासन निर्णयाला पूर्णपणे हरताळ फासत निधीचे बेकायदेशीर वाटप केल्याचा गंभीर आरोप भास्कर भैलुमे यांच्यासह आंदोलकांनी केला. दलितवस्ती निधीच्या कथित काळाबाजार आणि उघड गैरव्यवहाराच्या



विरोधात मंगळवारी कर्जत नगरपंचायतीमध्ये संतापाचा तीव्र उद्रेक पाहायला मिळाला. वास्तविक पाहता प्रशासनाला जाग आणण्यासाठी आठ दिवसांपूर्वीच निवेदन देण्यात आले होते. मात्र तरीही प्रशासन आणि जबाबदार पदाधिकारी गैरहजर राहिल्याने संतप्त आंदोलकांनी थेट नगराध्यक्ष आणि मुख्याधिकाऱ्यांच्या खुर्चीला चपलाचा हार घालून तीव्र निषेध नोंदवत नगरपंचायतीच्या आवारात हलगीच्या कडकडाटात ठिय्या आंदोलन केले.

सध्या मराठा आरक्षण आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर कर्जत तालुक्यातून मनोज जरागे हे मुबंईच्या दिशेने जात असल्याने स्थानिक पोलिस प्रशासन त्यात व्यस्त आहे. कायदा-सुव्यवस्थेच्यादृष्टीने भास्कर भैलुमे यांनी आजचे आंदोलन तात्पुरते स्थगित केले. मात्र यावर योग्य ती कार्यवाही न झाल्यास आगामी काळात राजकीय पदाधिकाऱ्यांसह प्रशासनास आत कोंडून टाळे ठोकण्याचा इशारा दिला.

# पशुधन विमा योजनेसाठी अर्ज मागविण्यास सुरुवात

## शेतकरी-पशुपालकांनी लाभ घेण्याचे पशुसंवर्धन विभागाचे आवाहन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** राज्यभरातील पशुपालकांच्या पशुधनाला विविध आजार, अपघात व नैसर्गिक आपत्तींपासून संरक्षण देण्यासाठी केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानांतर्गत (NLM²) 'पशुधन विमा योजना' राबवण्यास शासनाने मान्यता दिली आहे. या योजनेसाठी शेतकरी-पशुपालक बांधवांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया सुरु असून शेतकरी-पशुपालकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन पशुसंवर्धन आयुक्त डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

पशुधन विमा योजनेमुळे पूर, वीज पडणे, अपघात आणि विषबाधा, तसेच पशुधनाचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास पशुधन गमावणाऱ्या पात्र पशुपालक, शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळणार आहे. या योजनेअंतर्गत विमा हप्त्याची ८५ टक्के रक्कम केंद्र व राज्य शासन (६०:४० प्रमाणात) भरणार असून, लाभार्थी पशुपालकाला केवळ १५ टक्के हिस्सा द्यावा लागेल. राज्यभरात या योजनेच्या अंमलबजावणीसाठी निविदा प्रक्रियेद्वारे 'ॲग्रीकल्चर इन्श्युरन्स कंपनी ऑफ इंडिया लि.' (AIC) ची निवड करण्यात आली आहे. विमा प्रीमियमचे १ वर्षासाठी ४.३० टक्के, २ वर्षांसाठी ७.५० टक्के आणि ३ वर्षांसाठी १०.५० टक्के असे दर निश्चित करण्यात आले आहेत.

> केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय पशुधन अभियानाअंतर्गत 'पशुधन विमा योजना' राज्यात प्रभावीपणे राबवण्यासाठी प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणे हा राज्यातील लाखो पशुपालकांसाठी अत्यंत दिलासादायक व महत्त्वाकांक्षी निर्णय आहे. या योजनेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व आपले पशुधन सुरक्षित करावे.
>
> – पंकजा मुंडे, पशुसंवर्धन, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री

> पशुधन विमा योजनेचे वैशिष्ट्य म्हणजे विमा प्रीमियमच्या ८५ टक्के भार केंद्र व राज्य शासन (६०:४०) उचलणार असून, पशुपालकाला केवळ १५ टक्के हप्ता भरावा लागणार आहे. तसेच, पूर, वीज पडणे, अपघात आणि विषबाधा यासारख्या नैसर्गिक आपत्तीमध्ये, तसेच पशुधनाचा अनैसर्गिक मृत्यू झाल्यास १५ दिवसांच्या आत थेट बँक खात्यात (DBT) विम्याची रक्कम जमा केली जाणार आहे. यामुळे प्रक्रियेत पारदर्शकता येईल व शेतकऱ्यांना वेळेत मदत मिळेल.
>
> –डॉ. रामास्वामी एन. (भा.प्र.से.) सचिव

विमा संरक्षणाची मर्यादा व निकष:

एका कुटुंबातील कमाल १० पशुधनासाठी अनुदानाचा लाभ मिळेल. दुभत्या गाईस कमाल मूल्य ७० हजार रुपये पर्यंत संरक्षण, दुभती म्हैस कमाल मूल्य ८० हजार रुपये पर्यंत संरक्षण,

बैल , रेडे अनुक्रमे ७० हजार आणि ८० हजार रुपये पर्यंत संरक्षण,

शेळी व मेंढी कमाल मूल्य ७ हजार रुपये प्रति जनावर याप्रमाणे राहील.

पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा वापर:

विम्यासाठी पशुधनाची नोंद 'भारत पशुधन प्रणाली' (NDLM²) वर १२ अंकी कानातील बिल्ल्यासह (Ear Tag / UID) असणे बंधनकारक आहे. विमा कंपनी UI सोबतच RFI तंत्रज्ञानाचा वापर करू शकेल, नो टॅग, नो क्लेम या नियम ाचे कडक पालन केले जाईल.

१५ दिवसांत क्लेम थेट खात्यात :

जनावराचा मृत्यू झाल्यास २४ तासांच्या आत विमा कंपनीला नोंदणीकृत संपर्क माध्यमाद्वारे कळवणे आवश्यक आहे. आवश्यक कागदपत्रे व पोस्ट-मॉर्टम अहवाल सादर केल्यानंतर १५ दिवसांच्या आत विम्याची रक्कम थेट शेतकऱ्याच्या बँक खात्यात (DBT) जमा केली जाईल. पात्र विमा क्लेमची मुदतीत भरपाई न दिल्यास विमा कंपनीला १२ टक्के दराने व्याज द्यावे लागेल. राज्यात या योजनेची अंमलबजावणी 'महाराष्ट्र पशुधन विकास मंडळ (MLDB), नागपूर' मार्फत केली जाणार असून राज्यस्तरावर पशुसंवर्धन आयुक्त या योजनेचे सनियंत्रण करतील, अशी माहिती मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शितलकुमार मुकणे यांनी कळविली आहे.

## दखल

### अपघातात लोणीतील तरुण उद्योजकाचा मृत्यू

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**



निरगुडसर : लोणी, ता. आंबेगाव येथील तरुण उद्योजक शकील शब्बीर सय्यद (वय ३५) यांचा बेल्हा-जेजुरी महामार्गावर पाबळ, ता. शिरूरजवळ झालेल्या अपघातात मृत्यू झाला.

शकील सय्यद हे काही कामानिमि त्त पाबळ येथे जात असताना त्यांची दुचाकी घसरून अपघात झाला. या अपघातात त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुली, एक मुलगा, आई-वडील, भाऊ आणि बहीण असा परिवार आहे.

शकील हे लोणी परिसरातील होतकरू तरुण उद्योजक म्हणून परिचित होते. व्यवसायाच्या माध्यमातून सर्वांशी आपुलकीने वागणारे आणि प्रेमळ व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची ओळख होती. त्यांच्या निधनाने लोणी व परिसरात शोककळा पसरली आहे. अंत्ययात्रेस ग्रामस्थ, शेतकरी, व्यापारी आणि नातेवाइक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक कार्यकर्ते चेतन लोखंडे यांनी बेल्हा-जेजुरी महामार्गावरील वाढत्या अपघातांचा प्रश्न उपस्थित केला. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे अनेक कुटुंबांतील कर्त्या व्यक्तींचा जीव जात असून, अपघात रोखण्यासाठी महामार्गावर तातडीने ठोस उपाययोजना करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

### पोलिसांशी हुज्जत प्रकरणी दोघांची निर्दोष मुक्तता

शिरूर : पोलिसांशी हुज्जत, धक्काबुक्की तसेच शासकीय काम ात अडथळा आणल्याच्या प्रकरणातील सचिन भालेकर व हर्षद ठुबे या दोघांची सबळ पुराव्याअभावी सत्र न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली. या प्रकरणात ॲड. संदीप पवार यांनी आरोपींच्या वतीने बाजू मांडली.

सन २०१६ मध्ये चाकण चौकात भालेकर व ठुबे यांच्या वाहनाचे कंटेनरच्या धडकेत नुकसान झाले होते. त्यावरून दोघांचा कंटेनरचालकाशी वाद सुरू असताना तेथे उपस्थित वाहतूक पोलिस व वॉर्डन यांनी वाहने बाजूला घेण्यास सांगितले. त्यावेळी पोलिसांशी हुज्जत व धक्काबुक्की करून शासकीय कामात अडथळा आणल्याचा आरोप करत दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.या प्रकरणाच्या अंतिम युक्तिवादात ॲड. संदीप पवार यांनी मारहाण झाली असल्यास वैद्यकीय पुरावा, कपडे फाटणे किंवा शरीरावर दुखापतीच्या खुणा आढळल्या असत्या, मात्र तसे कोणतेही पुरावे नसल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच घटनास्थळी उपस्थित स्वतंत्र साक्षीदारांची साक्ष तपासण्यात आली नसल्याचे त्यांनी नमूद केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर सत्र न्यायाधीश एन. एस. मोमीन यांनी जखमी झाल्याचा वैद्यकीय पुरावा नसल्याचे तसेच स्वतंत्र साक्षीदार तपासले गेले नसल्याचे नमूद केले. फिर्यादी पक्षाला आरोपींविरुद्ध आरोप वाजवी संशयापलीकडे सिद्ध करता आले नसल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने भालेकर व ठुबे यांची निर्दोष मुक्तता केली.

### गणेशोत्सवानिमित्त मोफत रुग्णवाहिका लोकार्पण



शिरूर : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गणेशभक्तांसाठी मोफत रुग्णवाहिका सेवेस प्रारंभ करण्यात आला. प्रभाग क्रमांक दोनच्या नगरसेविका स्वप्नाली योगेश जामदार यांच्या संकल्पनेतून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे लोकार्पण दानशूर उद्योजक प्रकाश धारीवाल यांच्या हस्ते झाले. यावेळी शिरूर नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा ऐश्वर्या अभिजीत पाचर्णे व उपनगराध्यक्ष मितेश गादिया उपस्थित होते.गणेश मंडळांनी अनावश्यक खर्च टाळून लोकोपयोगी उपक्रम राबविणे कौतुकास्पद असल्याचे प्रकाश धारीवाल यांनी सांगितले. नगराध्यक्षा ऐश्वर्या पाचर्णे यांनीही प्रभागात सातत्याने राबविण्यात येणाऱ्या सामाजिक उपक्रमांचे कौतुक केले.नगरसेविका स्वप्नाली जामदार म्हणाल्या, गणेशोत्सव काळात आपत्कालीन प्रसंग उद्भवल्यास नागरिकांना तत्काळ रुग्णवाहिका उपलब्ध व्हावी, या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली आहे. प्रभागातील सर्व गणेश मंडळांना सोबत घेऊन हा उपक्रम राबविण्यात येत आहे.यावेळी नगरसेवक रवींद्र ढोबळे, सभापती सुनील जाधव, माजी नगरसेवक मुज्जफर कुरेशी, सचिन धारीवाल, मुन्नाभाई शेख, माजी शिक्षण सभापती तुकाराम खोले, भूमिपुत्र प्रतिष्ठानचे सुशांत कुटे, डॉ. संतोष पोटे, गणेश कोळपकर, बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. विकास फडतरे, डॉ. वैशाली साखरे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर व गणेश मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या बैठकीत दोन प्रकरणांवर सुनावणी

**पुणे :** विभागीय आयुक्त शीतल तेली उगले यांच्या अध्यक्षतेखाली पुणे विभागीय भ्रष्टाचार निर्मूलन समितीची तिमाही बैठक झाली. बैठकीत पुणे जिल्ह्यातील दोन प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली.या वेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक रंजन कुमार शर्मा, अपर आयुक्त तुषार ठोंबरे, लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे प्रभारी पोलिस अधीक्षक तथा समितीचे सदस्य सचिव अजित पाटील यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.



# सीआयआरटीच्या हीरक महोत्सवी वर्षाचा प्रारंभ

## नितीन गडकरी यांच्या हस्ते लोगोचे अनावरण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पिंपरी :** केंद्रीय रस्ते वाहतूक संस्थेने सीआयआरटीने स्थापनेच्या ६०व्या वर्षात प्रवेश केला असून, २०२६-२७ हे वर्ष हीरक महोत्सवी वर्ष म्हणून साजरे करण्यात येणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन जयराम गडकरी यांच्या हस्ते नागपूर येथे महोत्सवी वर्षाचा औपचारिक प्रारंभ करण्यात आला. यावेळी हीरक महोत्सवी वर्षाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले.

'सुरक्षित आणि संरक्षित वाहतूक सुनिश्चित करणे' ही संकल्पना लोगोमधून मांडण्यात आली असून, रस्ता सुरक्षा, सुरक्षित वाहतूक, तांत्रिक नवकल्पना आणि भविष्यातील वाहतूक व्यवस्थेवर सीआयआरटीचा विशेष भर राहणार आहे.

सीआयआरटीचे संचालक डॉ. देवेंद्र सिंह यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने गडकरी यांची भेट घेऊन पुण्यातील सीआयआरटीमध्ये आयोजित होणाऱ्या मुख्य कार्यक्रमाच्या उद्घाटनासाठी त्यांना निमंत्रित केले. यावेळी औपचारिक निमंत्रणपत्र व विशेष निमंत्रणिका प्रदान करण्यात आली. शिष्टमंडळात तांत्रिक सचिवालयाचे प्रमुख शेखर ढोले, ऑटोमोटिव्ह सायबर सुरक्षा विभागाचे प्रमुख फारुख मखदूम आणि संशोधन व सल्लागार सेवा विभागाचे प्रमुख उमेश सूर्यवंशी यांचा समावेश होता.

हीरक महोत्सवी वर्षात पुण्यात भव्य उद्घाटन सोहळा, वाहनांमधील परस्पर संवाद तंत्रज्ञानावर राष्ट्रीय कार्यशाळा, वाहन सायबर सुरक्षा चाचणी प्रयोगशाळेचे उद्घाटन तसेच वाहन उत्पादकांसाठी चाचणी व प्रमाणन कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांसाठी वाहन सायबर सुरक्षा कौशल्य विकास कार्यक्रम, तांत्रिक कार्यशाळा, ज्ञानमालिका, प्रवासी सुरक्षेबाबत जनजागृती अभियान आणि रस्ता सुरक्षा महिन्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत. सीआयआरटीच्या सहा दशकांच्या वाटचालीत योगदान देणाऱ्या व्यक्ती व संस्थांचा सन्मानही करण्यात येणार आहे.

१९६७ पासून सीआयआरटीने वाहन चाचणी, प्रमाणन, संशोधन, सल्लागार सेवा आणि प्रशिक्षणाच्या माध्यमातून देशाच्या रस्ते वाहतूक क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. हीरक महोत्सवी वर्षाच्या माध्यमातून अधिक सुरक्षित, तंत्रज्ञानाधारित आणि शाश्वत रस्ते वाहतूक व्यवस्था उभारण्याच्या प्रयत्नांना चालना देण्यात येणार आहे.

# भीमाशंकर विकास आराखड्याला गती द्या : जिल्हाधिकारी डुडी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**




**पुणे :** भीमाशंकर मंदिर व परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी तयार करण्यात आलेल्या विकास आराखड्याची प्रभावी अंम लबजावणी करून कामांना गती द्यावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले. स्थानिक ग्रामस्थांचे नियोजनबद्ध पुनर्वसन, भाविकांना आवश्यक सुविधा आणि पर्यावरण संवर्धन यांचा समन्वय साधून विकास करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात भीमाशंकर मंदिर व परिसराच्या विकास आराखड्याचा आढावा घेण्यात आला. यावेळी आमदार बाबाजी काळे, जिल्हा नियोजन अधिकारी प्रकाश इंदलकर, मंदिराचे विश्वस्त, ग्रामस्थ व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आराखड्यानुसार ग्रामस्थांना त्यांच्या विद्यमान जमिनीच्या क्षेत्रफळानुसार भूखंड देण्यात येणार असून, त्यावर एक, दोन आणि तीन बीएचके स्वरूपातील सुसज्ज घरे बांधण्यात येणार आहेत. नव्या गावात ग्रामपंचायत, प्राथमिक आरोग्य केंद्र, अंगणवाडी, शाळा, बहुउद्देशीय सभागृह, समाजमंदिर, अन्नछत्र, पार्किंग, सार्वजनिक स्वच्छतागृहे, पाणीपुरवठा, पथदिवे तसेच सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापनाच्या सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.मंदिर परिसरातून गावाला जोडणारा कॉरिडॉर, प्रसादगृह, होल्डिंग एरिया, बसण्याची व्यवस्था आणि स्वच्छतागृहे उभारण्यात येणार आहेत. दर्शनानंतर भाविकांना पायरी म ार्गाने गावात येता येणार असल्याने स्थानिकांच्या व्यवसायाला चालना मिळण्याची अपेक्षा आहे. नदी व कुंड परिसराची स्वच्छता, फेन्सिंग आणि सुरक्षित तीर्थस्नानाची व्यवस्था करण्याबाबतही चर्चा झाली. पावसाळ्यानंतर ऑक्टोबरपासून कामांना गती देऊन जून २०२७ पर्यंत प्रकल्प पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. विकासकाम ांनंतर अतिक्रमण किंवा अनधिकृत बांधकाम होऊ नये, यासाठी ग्रामस्थांनी सहकार्य करावे, असे आवाहन डुडी यांनी केले. बैठकीत विकास आराखड्याची चित्रफित दाखवून प्रस्तावित काम ांची माहिती ग्रामस्थांना देण्यात आली.

# कवठे येमाईत गणेशाचे उत्साहात आगमन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कवठे येमाई :** गणपती बाप्पाच्या जयघोषात, ढोल-ताशांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात शिरूर तालुक्यातील कवठे येमाई येथे गणरायाचे उत्साहात आगमन झाले. गावातील मानाच्या गुरुदेवदत्त ग्रामविकास प्रतिष्ठानच्या गणपतीची विधिवत पूजा करून रात्री ७.५० वाजता प्रतिष्ठापना करण्यात आली.आळंदी येथील वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थिनींनी सादर केलेल्या सुरेल भजन आणि गवळणींनी मिरवणुकीत रंगत आणली. डीजे विरहित आणि शांततामय मिरवणुकीतून सामाजिक सलोखा व शांततेचा संदेश देण्यात आला. प्रतिष्ठापनेनंतर भाविकांसाठी मासवडीच्या पारंपरिक भोजनाची व्यवस्था करण्यात आली होती.

गणेशोत्सवानिमित्त पुढील बारा दिवस विविध धार्मिक, सामाजिक, समाजोपयोगी व करमणुकीचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. आकर्षक मंडप व रोषणाईमुळे परिसर उजळून निघाला आहे. मंडप व्यवस्थेत आमदाबाद येथील मंडप व्यवस्थापक राजू जाधव यांचे योगदान आहे.

# गणेशोत्सवात माल लोड-अनलोडसाठी वेळ निश्चित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक सुरळीत व सुरक्षित ठेवण्यासाठी दुकानांमध्ये मालाची ने-आण तसेच लोडिंग-अनलोडिंगच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. १४ ते २४ सप्टेंबरदरम्यान हलक्या मालवाहू वाहनांना पहाटे २ ते सकाळी ११ या वेळेत माल लोड-अनलोड करण्यास परवानगी देण्यात आली आहे.

पुणे शहर वाहतूक शाखेचे पोलिस उपआयुक्त डॉ. संदीप भाजीभाकरे यांनी महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाच्या अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायद्यातील तरतुदींनुसार हे आदेश जारी केले आहेत.

भोरे आळी, गणेश पेठ, रविवार पेठ, शुक्रवार पेठ, मंडई, लक्ष्मी रस्ता, बाजीराव रस्ता तसेच मध्यवर्ती भागातील दुकानांमध्ये या वेळेत हलक्या मालवाहू वाहनांद्वारे मालाची ने-आण करता येणार आहे. गणेशोत्सव काळात नागरिकांची मोठी गर्दी होत असल्याने वाहतूक कोंडी आणि अपघात टाळण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

व्यापारी व दुकानदारांनी निर्धारित वेळेचे पालन करून वाहतूक पोलिसांना सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरोघरी गणरायाचे आगमन ; गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर :** विघ्नहर्ता आणि मंगलमूर्ती श्री गणरायाच्या आगमनाने सोमेश्वरनगर, करंजे परिसरासह बारामती तालुक्यात गणेशोत्सवाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे. घरोघरी गणरायाच्या मूर्तींची विधिवत प्रतिष्ठापना करण्यात आली असून, सर्वत्र भक्तिमय आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

गणेशमूर्तींची प्रतिष्ठापना करण्यासाठी सकाळपासूनच नागरिकांची लगबग सुरू होती. आकर्षक सजावट, फुलांची आरास, विद्युत रोषणाई तसेच पारंपरिक पद्धतीने गणरायाचे स्वागत करण्यात आले. गणपती बाप्पा मोरया, मंगलमूर्ती मोरया, अशा जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. गणेशोत्सवानिमित्त विविध मंडळांकडून



गणेशाची मूर्ती स्थापना करताना स्वप्नील काकडे परिवार वाणेवाडी.

डोल तश्यानाच्या गजरात तसेच सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गणरायाच्या आगमनामुळे लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, पुढील दिवसांत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल पाहायला मिळणार आहे.

श्री गणराय सर्वांच्या जीवनात सुख, समृद्धी, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, अशी भावना नागरिकांसह प्रत्येक कुटुंब सदस्यांनी व्यक्त केली.

# आजोबांच्या स्मृती जोपासत नातवाने लावले वटवृक्ष

**मयुर कुदळे । राष्ट्र सह्याद्री**

**जेजुरी :** येथील खंडोबा देव आणि जानुबाई देवीचे निस्सीम भक्त असलेले कै. रामचंद्र कृष्णाजी हरपळे यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या परिसरात दोन वटवृक्षांची लागवड करण्यात आली. सामाजिक बांधिलकी जोपासत पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत हा उपक्रम राबविण्यात आला.

कै. रामचंद्र हरपळे यांच्या स्मृती कायम जपल्या जाव्यात, या भावनेतून त्यांच्या कुटुंबीयांनी वटवृक्षांची लागवड केली. त्यांचा नातू अर्श हरपळे यानेही आपल्या आजोबांच्या आठवणी कायम स्मरणात राहाव्यात, या भावनेतून शाळेतील सवंगड्यांसमवेत वटवृक्षाची लागवड केली. तसेच लावण्यात आलेल्या दोन्ही वटवृक्षांचे नियमित संगोपन करण्याचा निश्चय अर्श याने केला.

यावेळी संतोष सावंत यांनी कै. रामचंद्र हरपळे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या विचारांचा आणि शिकवणीचा उल्लेख केला. त्यांच्या जीवनातील संस्कार व मूल्ये पुढील पिढीने जपावीत, असे सांगत त्यांनी कै. रामचंद्र हरपळे यांना श्रद्धांजली अर्पण केली. या उपक्रमास कै. रामचंद्र हरपळे यांचे पुत्र अनिकेत रामचंद्र हरपळे, नातू अर्श हरपळे, जिजामाता इंग्लिश मीडियम स्कूलच्या मुख्याध्यापिका कोमल चौगुले, शिक्षिका भावना देवकर, नंदिनी शेवते, शिक्षक किरण मोडक, नगरसेवक स्वप्नील (बंटी) हरपळे, उद्योजक अनंत देशमुख, राजू पानसरे, संतोष सावंत, संतोष आप्पा वाईकर, सचिन देशमुख, किशोर भगत, सोमनाथ हरपळे, मयुर कुदळे, देवेंद्र जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.



# कोरडगावात ‘बत्ती गुल’; तीन दिवसांपासून अर्धे गाव अंधारात!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** ता. पाथर्डी गणरायाच्या आगमनाने गावागावांत उत्साहाचे वातावरण असताना कोरडगाव मात्र गेल्या तीन दिवसांपासून अंधारात आहे. गावातील विद्युत रोहित्राचा आर्थिंग रॉड तुटल्याने अर्ध्या गावातील वीजपुरवठा विस्कळीत झाला असून, नागरिकांना ऐन गणपती उत्सवाच्या काळात अंधाराचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे वारंवार तक्रार करूनही संबंधित वायरमनकडून याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

गेल्या तीन दिवसांपासून अर्ध्या गावातील वीजपुरवठा सुरळीत नसल्याने घरगुती जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. काही भागात वीज पूर्णपणे गायब तर काही ठिकाणी कमी-जास्त दाबाने वीजपुरवठा होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. या अनियमित वीजपुरवठ्यामुळे अनेक नागरिकांचे फिल्टर, टीव्ही, फॅन, कुलर, चार्जर तसेच इतर विद्युत उपकरणे जळून नुकसान झाल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

सध्या कोरडगावात गणपती उत्सवाची धामधूम सुरू आहे. विविध मंडळांकडून गणरायाची स्थापना करण्यात आली असून, रात्रीच्या वेळी आरती, भजन व धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जात आहे. मात्र, वीजपुरवठ्याच्या या गंभीर समस्येमुळे उत्सवावरही अंधाराचे सावट आले आहे. गावातील रस्ते व परिसर अंधारात राहत असल्याने नागरिक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांची गैरसोय होत आहे.

**वायरमन स्थानिक नसल्याने नागरिकांची अडचण**

गावातील वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तातडीने दुरुस्ती होणे अपेक्षित असताना, संबंधित वायरमन स्थानिक पातळीवर राहत नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. नागरिकांच्या म्हणण्यानुसार, एकदा वीज गेल्यानंतर दुरुस्तीला विलंब होऊन अनेकदा दुसऱ्या दिवशी सकाळी दहानंतरच वीजपुरवठा सुरू होतो. त्यामुळे रात्रीच्या वेळी नागरिकांना अंधारात राहण्याची वेळ येत आहे.

**पाणीटंचाईच्या काळात बोअरही बंद**

कोरडगाव परिसरात सध्या पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. गावातील अनेक नागरिक पिण्याच्या व घरगुती वापराच्या पाण्यासाठी बोअरवेलवर अवलंबून आहेत. मात्र वीजपुरवठा नसल्याने बोअर सुरू करता येत नसल्याने ‘वीज नाही, पाणी नाही’ अशी गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

# जि.प. शाळेला साऊंडबॉक्स, किचनशेड पत्रे व स्लाइडिंग खिडक्यांची भेट!

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**राशीन :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा राशीन मुले येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक व भौतिक सुविधांसाठी सामाजिक बांधिलकी जपत विविध देणगीदारांनी मदतीचा हात पुढे केला. यावेळी शाळेला किचनशेडचे नवीन पत्रे, दोन साऊंडबॉक्स तसेच संगणक लॅबसाठी स्लाइडिंग खिडक्या भेट देण्यात आल्या.

हॉटेल बेलेकर गार्डनचे संचालक दीपक बेलेकर यांनी शाळेच्या किचनशेडसाठी नवीन पत्रे बसवून दिली. हॉटेल अन्नपूर्णाचे संचालक शेखर शिवाजीराव सुरवसे यांनी शाळेला दोन साऊंडबॉक्स भेट दिले. तसेच इंजिनियर गणेश बनसोडे यांनी संगणक लॅबसाठी स्लाइडिंग खिडक्या भेट दिल्या.

या सामाजिक योगदानाबद्दल सर्व देणगीदारांचा सत्कार करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विजयकुमार साळवे, उपाध्यक्ष निलेश चव्हाण, मुख्याध्यापक अशोक नेवसे, मुलींच्या शाळेचे प्रभारी मुख्याध्यापक विठ्ठल साळवे, तसेच किरण जाधव व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत हा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला.

यावेळी बापूराव वावगे, प्रदीप कोकाटे, राजीव राठोड, भास्कर घोडके, रमेश मासाळ, गणेश पंडित, संतोष मुसळे, रावसाहेब ढवळे, उज्वला पंडित, वृषाली धेंडे, स्मिता गुणवरे, तृप्ती भापकर, विजया जगताप, भारती जाधव, रेणुका चव्हाण, सोनाली रसाळ यांच्यासह शिक्षक व मान्यवर उपस्थित होते.

शाळेच्या भौतिक सुविधांचा विकास करण्यासाठी माजी विद्यार्थ्यांनीही पुढाकार घेऊन लोकसहभागातून शाळेला आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, असे आवाहन मुख्याध्यापकांनी केले. देणगीदारांच्या या योगदानामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगल्या शैक्षणिक सुविधा मिळण्यास निश्चितच मदत होणार आहे.

## द•ख•ल

### बाप्पांच्या आगमनाचे निघोज परिसरात जोरदार स्वागत



**निघोज :** गणपती बाप्पांच्या आगमनाचे निघोज आणी परिसरात जोरदार स्वागत करण्यात आले. टाळ मृदंग झांज पथक, ताशा पिपानी पथक या वाद्यांच्या तालावर गणपती बाप्पा मोरया, मंगल मूर्ती मोरया,उंदीरमामाकी जय या जयघोषाने आसमंत दणाणून गेला होता. जवळपास निघोज व परिसरात पन्नास पेक्षा जास्त गणेश मंडळे कार्यरत असल्याने मुर्ती वाजत गाजत नेण्यासाठी सकाळी ८ वाजेपासून ते रात्री उशिरापर्यंत मिरवणुका सुरु होत्या. निघोज व परिसरातील पौराहित्य देशपांडे व धोंगडे यांच्या हस्ते विधीवत पूजा करुण तसेच मान्यवरांच्या हस्ते महाआरती करीत मंडळांनी विधीवत पूजा करीत बाप्पाचे जोरदार स्वागत केले.

### पाडळी आळेत ७५ लाखांहून अधिकच्या विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण



**निघोज :** पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील पाडळी आळे परिसरातील विविध विकासकामांना चालना देणारा भूमिपूजन व लोकार्पण सोहळा आमदार काशिनाथ दाते सर यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. आमदार काशिनाथ दाते सर यांच्या माध्यमातून विविध विकासकामे मार्गी लागत असून, याच अनुषंगाने पाडळी आळे येथे सुमारे ७५.३७ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण करण्यात आले. यावेळी पाडळी आळे परिसरातील रस्ते, अंगणवाडी इमारत, गावठाणातील जागा तसेच श्री सिद्धिविनायक मंदिर परिसरातील पेव्हिंग ब्लॉक आदी विकासकामांचा समावेश असलेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले. या कार्यक्रमास प्रशांत गायकवाड, वसंतराव चेडे, आर एस कापसे, संदिप वराळ, सचिन वराळ, भास्कर उचाळे, दिनेश बाबर, रेश्मा गलांडे, राजेंद्र उबाळे, लक्ष्मण डेरे, प्रविण चौधरी यांच्यासह बबन बाजीराव थोरात, एपीआय विठ्ठल जगताप, गंगाराम थोरात, बबन जगताप, रखमा जगताप, दत्तू थोरात, भाऊसाहेब जगताप, सुशांत थोरात, अनिल जगताप, सचिन जगताप, मंगेश जगताप, महेंद्र जगताप, सुनील जगताप, वसंत जगताप, शिवाजी जगताप, सुमित जगताप, संदीप जगताप, गणपत जगताप, बाळासाहेब जगताप, कोंडीभाऊ जगताप, दीपक जगताप, राजू थोरात, शिवाजी थोरात, किरण थोरात, माऊली थोरात, उत्तम जगताप, रोहित जगताप, भाऊसाहेब थोरात, दत्तात्रय थोरात, शशी थोरात, प्रवीण थोरात, प्रतीक थोरात यांच्यासह श्री सिद्धिविनायक महिला बचत गट, श्री सिद्धिविनायक ऋशप न ॠीिचे सदस्य, विविध गावांचे पदाधिकारी आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

### ज्ञानवर्धिनी परीक्षेमुळे शिष्यवृत्ती परीक्षेला मिळणार नवी दिशा : दरे



**टाकळी ढोकेश्वर :** विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक परीक्षेची गोडी निर्माण व्हावी, शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी भक्कम व्हावी आणि ग्रामीण भागातील विदयार्थ्यांना गुणवत्तापूर्ण सरावाची संधी मिळावी या उद्देशाने संस्थेच्या वतीने इयत्ता पाचवी व सहावीच्या विद्यार्थ्यांसाठी ’शिष्यवृत्तीपूर्व ज्ञानवर्धिनी स्पर्धा परीक्षा’ सुरु करण्यात आली आहे यामुळे सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेला नवी दिशा मिळणार असल्याचे प्रतिपादन जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रा. ह. दरे यांनी केले. या पुस्तक लेखनात सहभागी विद्यालयातील पर्यवेक्षक बाळासाहेब निवडुंगे, बाबासाहेब जाधव, अतुल सैद या शिक्षकांचा सन्मान अध्यक्ष रा. ह. दरे,सचिव ॲड. विश्वासराव आठरे, ॲड. दिपलक्ष्मी म्हसे, जी.डी.खानदेशी, जयंत वाघ, रेसिडेन्सिअल प्राचार्य विजय जाधव,उपप्रचार्य दादासाहेब वांढेकर,ढोकेश्वर विद्यालयाचे प्राचार्य बाळासाहेब खिलारी,विविध शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक,तज्ज्ञ शिक्षक,पुरस्कार प्राप्त विद्यार्थी उपस्थित होते. ढोकेश्वर विद्यालयाच्या आराध्या कडुस्कर, वैभवी कटारिया तसेच ज्ञानवर्धिनी पुस्तक लेखनात सहभागी शिक्षक यांचे विशेष अभिनंदन संस्थेचे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ विश्वस्त नंदकुमार झावरे, सिताराम खिलारी गव्हार्निंग कौन्सिल सदस्य डॉ.भाऊसाहेब खिलारी यांनी केले.

### दुष्काळी परिस्थितीत रोहयोची कामे तात्काळ सुरु करा : खोसे

**ढोरजळगांव :** ता.शेवगांव परीसरासह ग्रामीण भागातून दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर राज्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप पिके पुर्णपणे वाया गेली असुन शेतकऱ्यांना व शेतमजुरांना रोजगाराच्या हाताला काम राहिले नसुन त्यांना आधार मिळावा यासाठी रोजगार हमीचे कामे त्वरित सुरू करण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रामजी खोसे यांनी केली आहे. रामजी खोसे बोलताना म्हणाले की यावर्षी पावसाने पाठ फिरविल्यामुळे पीक हाताची गेली असुन पाणीटंचाई निर्माण झाली आहे सध्या दुष्काळी भागात मजुरांच्या हाताला काम नसल्यामुळे शेतमजुरांचे स्थलांतर रोखण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत (चत्रछ्ठएत्रऋ-) मोठ्या प्रमाणावर सिंचन, विहीर, रस्ते आणि जलसंधारणाची कामे सुरू करणे गरजेचे आहे. रोजगार हमी योजनेच्या कामांसोबतच पिण्याच्या पाण्याची सोय करणे गरजेचे असुन त्यासाठी पिण्याच्या पाण्याचे टँकर सुरु करण्याचे ठराव ग्रामपंचायतीच्या वतीने संबंधित विभागाला देण्यात आले आहेत तसेच पशुधनासाठी तातडीने चारा छावण्या व चारा डेपो सुरू करण्याची मागणीही त्यांनी केली आहे.

# संत वामन भाऊ मंडळाने बनविली १११ किलो रद्दीपासून गणेश मूर्ती

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** शहरातील संत वामन तरुण मंडळाने यंदा कागदापासून पर्यावरण पूरक गणेश मूर्तीची स्थापना करत जिल्ह्यात आगळावेगळा लक्षवेधी उपक्रम हाती घेतला. यासाठी प्रभागातील रहिवाशांकडून १११ किलो रद्दी गोळा केली. गुलाल, डीजे व प्लास्टिक मुक्त गणेश उत्सव असे घोषवाक्य देत मंडळांने भरगच्च कार्यक्रम घोषित केला आहे. मंडळातील कार्यकर्त्यांचे महिला भजनी मंडळ यंदा स्थापना मिरवणुकीमध्ये शहरवासी यांचे लक्ष वेधणारे ठरले.

शहरामध्ये अत्यंत प्राचीन असे भव्य मूर्ती असलेले गणेश मंदिर जय भवानी चौकात आहे. या मंदिराला शेकडो वर्षांचा इतिहास आहे. नगरच्या विशाल गणपती सारखी श्रद्धा शहरवासीयांची शहरातील अशा स्वरूपाच्या दोन्ही गणेश मंदिरांवर आहे. शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक दोन्ही मंदिरांसमोरून जाते. कागदापासून बनविलेली गणेश मूर्ती याच मूर्तीची हुबेहूब प्रतिकृती झाल्याने अनेक कार्यकर्ते व परिसरातील नागरिकांनी गणपती पाहण्यासाठी गर्दी केली.




मंडळाचे अध्यक्ष सचिन नागापुरे यांनी या मूर्तीची कल्पना मांडत सर्व कार्यकर्त्यांच्या सक्रिय सहभागाने अवघ्या पंधरा दिवसात मूर्तीचे काम पूर्ण झाले. वॉटर कलर, सुतळी व चिकटपट्ट्यांच्या साह्याने मूर्ती पूर्ण झाली. निवासी मतिमंद बालगृहातील विद्यार्थी, मुख्याध्यापक सचिन तरवडे, कलाशिक्षक अशोक जेधे, अतुल ससे, मुस्ताला शेख, प्रकाश तुजारे, विद्यालयाचे संस्थापक प्रताप निराळी यांचे सक्रिय सहकार्य लाभले. मंडळाचे कार्यकर्ते सिद्धार्थ गायकवाड, कृष्णा जेधे, प्रवीण आव्हाड, प्रणव गव्हाणे, कार्तिक कराड, विराज गर्जे, ऋषिकेश गायकवाड, भूषण नागापुरे ,लक्ष बाफना आदींसह सर्वच कार्यकर्त्यांनी मोठे योगदान दिले. मंडळाचे डॉ. मृत्युंजय गर्जे, संतोष गायकवाड, धनंजय बडे, अनिल ढाकणे, नंदुरबारचे पोलीस निरीक्षक किरण खेडकर, नितीन गर्जे, आदींचे मार्गदर्शन लाभले. खुलेनाट्यगृहा पासून वामन भाऊ नगर पर्यंत महिला भाविकांसह टाळ मृदुंगाच्या पथकाने अत्यंत शिस्तबद्ध व लक्षवेधी मिरवणूक काढली. शहरामध्ये सुवर्णयुग मंडळानंतर संत वामन भाऊ गणेश मंडळामध्ये महिला कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग बघायला मिळत आहे.

# ‘बुद्धांचा धम्म आपल्या दारी’ अभियानाचा १०० वा कार्यक्रम



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** संपूर्ण जगाला शांततेचा संदेश देणाऱ्या तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या विज्ञानवादी विचाराचा १०० वा वर्षावासानिमित्त धम्म प्रवचन मालिका कार्यक्रम भारतीय बौद्ध महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रबोधी पाटील यांच्या आदेशान्वये व पूज्य भंते सारिपुत्त यांच्या मार्गदर्शनाखाली नुकताच शेवगाव तालुक्यातील अंतरवली येथे उत्साहात संपन्न झाला असल्याबाबतची माहिती भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष तथा बौद्धचार्य वसंतराव बोर्डे व बाळासाहेब गजभिव यांनी दिली आहे. या बाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की, विश्वरत्न, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्मांतराच्या घोषणेनंतर अभ्यास करून जो विज्ञानवादी बौद्ध धम्म नागपूर येथे दीक्षाभूमीवर स्वीकारला आहे. ३ महिने सुरू असलेल्या या कार्यक्रमाला शेवगाव व पाथर्डी तालुक्यात प्रचंड प्रतिसाद मिळत असून तो कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वसंतराव बोर्डे, बाळासाहेब गजभिव, सुभाष गायकवाड, संजय साळवे,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ नेते अंबादास आरोळे,बाजीराव बोर्डे, परमेश्वर खंडागळे यांच्यासह दोन्ही तालुक्यातील भारतीय बौद्ध महासभेचे कार्यकर्ते विशेष प्रयत्न करत असल्याचेही शेवटी बोर्डे व गजभिव यांनी सांगितले आहे.

# दुष्काळामुळे मोठ्या ऐवजी छोट्या गणपतीलाच जास्त मागणी ?

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**हातगाव :** चालू वर्षाचा पावसाळ्याचा हंगाम ३ महिन्याचा कालावधी संपून गेला असून सुद्धा बऱ्यापैकी पाऊस न झाल्याने शेवगाव तालुक्यात दुष्काळजन्य परस्थिती निर्मांन झाली असल्यामुळे प्रत्येक वर्षी मोठ्या उत्साहात साजरा होणाऱ्या गणपती स्थापनेवर त्याचा मोठा परिणाम झाला असल्याचे चित्र दिसून येत असून प्रत्येक वर्षी गणपती खरेदी करताना नागरिक कुठलाही आर्थिक विचार न करता आपल्या पसंतीचे मोठ - मोठे गणपती खरेदी करत होते ते मात्र चालू वर्षी दुष्काळ परिस्थितीमुळे असंख्य ग्राहकांनी छोटे - छोटे गणपती घेण्याकडे मोठा कल दिला असल्याने व असा प्रकार घडत राहिल्यास मोठे गणपती विक्रीपासून शिल्लक राहतील हे लक्षात येताच भीतीपोटी नावीलाजाणे मोठ्या असणाऱ्या गणपती मूर्तीचा भाव कमी करून विक्री करावी लागली आहे असे माहिती शेवगाव तालुक्यातील कांबी येथील ग्रामीण भागांतील गणपती बनवणारे कारखानदार निवृत्ती चित्ते यांनी आमचे प्रतिनिधीजवळ बोलताना दिली आहे.




या बाबत अधिक माहिती देताना त्यांनी सांगितले आहे की, मी व गावातीलच माझे २ सहकारी असे तिघेजण मिळून आम्ही आमच्या कारखान्यात गेली २५ वर्षांपासून प्रत्येक वर्षी गणपती तयार करून त्याची विक्री करत आहोत. कारण तालुक्यात शेवगाव शहरानंतर थेट कांबी येथेच गणपती बनवण्याचा कारखाना होता व आहे आता काही वर्षापूर्वी बोधेगावात २ कारखाने निर्माण झाले असून चालू वर्षी मात्र आम्हा तिघांच्या मिळून अंदाजे गणपतीच्या ३ हजार मुर्त्यांची विक्री झाली असून या विक्रीतून आम्हाला फार नफा मिळाला नसून खर्चाच्या मानाने बरोबरीत व्यवसाय झाला असल्याचे सांगून आमच्याकडे गणपतीच्या मुर्त्या खरेदी करण्यासाठी गेवराई तालुक्यातील गुंतेगाव, मालेगाव, पाथरवाला, बोरगाव, शेवगाव तालुक्यातील गायकवाड जळगाव, बालमटाकळी, बोधेगाव, हातगावसह इतरही ठिकाणाहून असंख्य नागरिक मोठ्या संख्येने येत असतात असेही शेवटी निवृत्ती चित्ते, पिंटू चितारे, पमू चितारे यांनी सांगितले आहे.

# राक्षी येथे शेतकऱ्यांचा रास्ता रोको

## पाझर तलावात पाणी सोडण्याची मागणी; तीन दिवसांत कार्यवाहीचे आश्वासन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शेवगाव :** शेवगाव तालुक्यातील राक्षी गावातील पाझर तलाव तसेच तलावालगतच्या नाल्यामध्ये ताजनापूर लिफ्ट टप्पा-२ अंतर्गत पाणी सोडण्यात यावे, या मागणीसाठी आज सकाळी ११ वाजेपर्यंत राक्षी येथे शेवगाव गेवराई या मार्गावर शेतकऱ्यांनी रास्ता रोको आंदोलन केले.पाण्याच्या प्रश्नाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी करण्यात आलेल्या या आंदोलनामुळे शेवगाव-गेवराई मार्गावरील वाहतूक काही काळ ठप्प झाली होती.

आंदोलनादरम्यान प्रशासनाच्या संबंधित अधिकाऱ्यांनी तसेच तहसीलदारांच्या उपस्थितीत शेतकरी प्रतिनिधींशी चर्चा केली. चर्चेनंतर प्रशासनाच्या वतीने शेतकरी प्रतिनिधींना लेखी आश्वासन देऊन पुढील दोन ते तीन दिवसांच्या आत ताजनापूर लिफ्ट टप्पा-२ अंतर्गत राक्षी गावातील पाझर तलावालगतच्या नाल्यामध्ये पाणी सोडण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे.

तसेच पाणी राक्षीच्या पाझर तलावापर्यंत सुरळीतपणे पोहोचण्यासाठी संबंधित पाईपलाईन व पाणी वितरण व्यवस्थेची पाहणी करून आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. लेखी आश्वासनानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले.

# महामार्ग झाले कुंटणखान्यांमुळे बदनाम!

## हॉटेल-लॉजिंगच्या नावाखाली ‘देहविक्री’; नागरिक त्रस्त, कठोर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका :** नगर शहरातून जाणाऱ्या प्रमुख महामार्गांलगत हॉटेल आणि लॉजिंगच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात देहविक्रीचे प्रकार सुरू असल्याच्या तक्रारींमुळे महामार्गांची प्रतिमा मलिन होत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. काही दिवसांपासून बंद असलेले हे प्रकार पुन्हा उघडपणे सुरू झाल्याचा आरोप होत असून संबंधित ठिकाणी केवळ वरवरची कारवाई न करता या व्यवसायाच्या मुळाशी जाऊन कठोर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

छत्रपती संभाजीनगर महामार्ग, सोलापूर महामार्ग, पुणे महामार्ग, नगर-दौंड मार्ग तसेच काही अंतर्गत रस्त्यांलगतच्या हॉटेल-लॉजिंगमध्ये अशा प्रकारांचे जाळे असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. महामार्गालगतचे ठराविक हॉटेल लॉजिंग याच व्यवसायांमुळे ओळखले जातात. काही ठराविक राजकीय पुढाऱ्यांच्या आशीर्वादाने असले व्यवसाय सुरू असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरू आहे.

यापूर्वी अशा प्रकरणांमध्ये पोलिसांनी केलेल्या कारवाईदरम्यान परराज्यातील तसेच परदेशी नागरिकत्वाशी संबंधित महिलांचा सहभाग आढळल्याची प्रकरणे समोर आली आहेत. त्यामुळे अशा घटनांच्या मागील संपूर्ण साखळीची चौकशी होण्याची गरज व्यक्त केली जात आहे. महामार्गालगत सुरू असलेल्या या प्रकारांमुळे परिसरातील महिला, पालक आणि विद्यार्थिनींमध्येही अस्वस्थता निर्माण होत असल्याचे नागरिक सांगतात. हॉटेलच्या आसपास संशयास्पद वर्दळ वाढल्याने स्थानिक रहिवाशांना त्रास सहन करावा लागत असल्याची तक्रार आहे. काही ठिकाणी या व्यवसायाशी संबंधित व्यक्तींची दहशत निर्माण होत असल्याचाही आरोप केला जात आहे.

सोलापूर महामार्ग परिसरात नगर तालुका पोलीस स्टेशनची हद्द संपताच अशा प्रकारांची मोठी चर्चा असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. अशीच परिस्थिती इतर महामार्गांवरही असल्याचा आरोप होत आहे. अशा प्रकरणात तात्पुरती कारवाई करण्याऐवजी अशा व्यवसायांना आश्रय देणारे हॉटेल, लॉज चालक, मालक, मध्यस्थ आणि अन्य संबंधित व्यक्ती यांची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर गुन्हे दाखल करावेत अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

**मुळावर घाव घालण्याची गरज !**

एखाद्या हॉटेलवर कारवाई झाल्यानंतर काही दिवसांनी त्याच ठिकाणी पुन्हा असले उद्योग सुरू होत असतील तर त्यामागील सूत्रधार कोण असा प्रश्न उपस्थित होत आहे. केवळ महिलांवर कारवाई न करता हॉटेल मालक, चालक, मध्यस्थ यांचीही चौकशी करण्याची गरज आहे.




या प्रकारांना आळा घालण्यासाठी पोलिसांनी सातत्यपूर्ण कारवाईची मोहीम राबविणे, हॉटेल-लॉजची तपासणी करणे गरजेचे आहे. महामार्गावर सुरू असलेले असे उद्योग कायमस्वरूपी बंद व्हावेत अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री

बुधवार दि.१६ सप्टेंबर २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

## गुटखा विक्रीवर एलसीबीचा छापा; १९ हजारांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : लोणी पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध गुटखा, मावा व सुगंधित तंबाखू विक्रीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून १९ हजार ३२८ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या प्रकरणी आबासाहेब सोपान बोरुडे (२८, रा. कोल्हार, ता. राहाता) व नवाब शेख (रा. राहुरी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नवाब शेख फरार असून पोलिस त्याचा शोध घेत आहेत. जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर कारवाईचे आदेश पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी दिल्यानंतर ही कारवाई करण्यात आली. पोलिस उपनिरीक्षक कृष्णकुमार सेदवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने ही कारवाई केली. आरोपींवर बीएनएसच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंती कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : तालुक्यातील भेंडा येथे लोकनेते मारुतराव घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंती कार्यक्रमाला ऊस उत्पादक शेतकरी वर्गासह नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.हजारो चाहत्यांनी यावेळी त्यांच्या स्मृती स्थळावर जाऊन अभिवादन केले. लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांनी विविध उपक्रमांच्या माध्यमातून 'वारकरी व शेतकरी' यांना एकत्र आणण्याची परंपरा सुरू केली आणि ती जपली, असे प्रतिपादन नेवासा येथील सदगुरु नारायणगिरी महाराज आश्रमाचे प्रमुख महंत उद्धव महाराज मंडलिक नेवासेकर यांनी केले.

लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना व उद्योग समूहाचे संस्थापक लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या ९६ व्या जयंतीनिमित्त सोमवार दि.१५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता श्रीसंत नागेबाबा भक्त निवास येथे आयोजित कार्यक्रमात उद्धवजी महाराज मंडलिक हे बोलत होते. कारखाना व उद्योग समूहाचे अध्यक्ष माजी आ. नरेंद्र घुले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.जिल्हा बँकेचे माजी अध्यक्ष माजी आ चंद्रशेखर घुले, कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे, संत ज्ञानेश्वरमहाराज संस्थानचे अध्यक्ष माजी आ. पांडुरंग अभंग, ड. देसाई आबा देशमुख, डॉ. क्षितिज घुले, संचालक पंडितराव भोसले, अशोकराव मिसाळ,दत्तात्रय काळे, डॉ.नारायण म्हस्के,जनार्धन कदम,मच्छिंद्र म्हस्के, बबनराव भुसारी, ड. हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, विकास नन्नवरे,संतोष पावसे, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, प्रसाद पटारे, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, बाळासाहेब खरड, काशिनाथ नवले, कॉ.सुभाष लांडे,कॉ.बंशी सातपुते, रवींद्र नवले,तुकाराम मिसाळ, सुदाम महाराज शास्त्री,शेतकरी नेते अंबादास कोरडे, निवृत्ती दातीर, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रविंद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते संत ज्ञानेश्वर माऊली व लोकनेते मारुतरावजी घुले पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.तसेच ऊस शेती मध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या ऊस उत्पादक शेतकऱ्यांना श्री ज्ञानेश्वर ऊस उत्पादकता पुरस्काराने गौरविण्यात आले. यात महिला शेतकऱ्यांचा देखील समावेश होता. यावेळी बोलताना महंत उद्धव महाराज पुढे म्हणाले, वै. बंन्सी महाराज तांबे यांचे सूचने वरून घुले साहेबांनी या साखर कारखान्याला माऊलींचे नाव दिले.

वारकरी संप्रदायातील संत-महंतांना बोलावून कार्यक्रमात आवर्जून सहभागी करून घेण्याची परंपरा स्व.घुले पाटील यांनी सूरु केली तीच परंपरा ज्ञानेश्वर उद्योग समूहाचे अध्यक्ष नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले यांनी देखील आजही सुरु ठेवली आहे, त्याबद्दल उद्योग समूहाचे मनापासून धन्यवाद व्यक्त करतो. दुष्काळाचे संभाव्य संकट आपल्या समोर आहे,त्यामुळे शेती बरोबरच घरातील व्यवस्थापन ही काटकसरीने करावे लागेल. ज्ञानेश्वर उद्योग समूहाची मोठ्या उमेदीने वाटचाल सुरु असून त्यास सर्वांनी साथ व पाठबळ द्यावे.




जनार्दन पटारे, अरुण लांडे, सुधाकर लांडे, रामजी आंधळे, दादासाहेब गंडाळ,सखाराम लव्हाळे, विष्णूपंत जगदाळे, बाळासाहेब मरकड, रामभाऊ जगताप, भावराव भोंगळे, अजित मुरकुटे, डॉ.शिवाजी शिंदे, अशोक वायकर,राजेंद्र चिंधे,डॉ. संतोष फुलारी, सोपान महापूर, वैभव नवले, भाऊसाहेब आगळे, शिवाजीराव गवळी, मारुतराव घुले पतसंस्थेचे अध्यक्ष बबनराव धस, कामगार संचालक सुखदेव फुलारी,कामगार संघटनेचे सचिव संभाजीराव माळवदे,अॅड.बाळासाहेब शिंदे, भानुदास कावरे, अंबादास कळमकर, हरिभाऊ नवले, कुमार नवले,भारत गुंजाळ,अड.रविंद्र गव्हाणे, अनिल मडके,ताहिर पटेल,बाबासाहेब लांडे,हनुमान पातकळ, मंगेश थोरात, कुंडलीक घोरताळे,विजयराव देशमुख, आशुतोष डहाळे,सुनिल काकडे आदि उपस्थित होते.कारखान्याचे उपाध्यक्ष काकासाहेब नरवडे पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. संचालक अशोकराव मिसाळ यांनी आभार मानले.

### शासनाने साखर उतारा घट अनुदान द्यावे : नरेंद्र घुले

अध्यक्षस्थानावरून बोलतांना श्री.नरेंद्र घुले पाटील म्हणाले की दुष्काळी परिस्थिती आहे.एकरी ऊस उत्पादनामध्ये तसेच साखर उत्पादनामध्ये घट होणार आहे. त्यामुळे शासनाने साखर उतारा घट अनुदान दयावे. तसेच शेतीला पूर्णवेळ विज देता येत नसेल तर वीजबील व शेतीकर्ज माफ करावे,चारा तगाई द्यावी. जायकवाडी व मुळा धरण पाण्यावर परिसरातील शेतकऱ्यांचा पहिला हक्क आहे. श्रमाला प्रतिष्ठा देणारा आणि मनोबल ऊंचवणारा हा आजचा कार्यक्रम आहे. शेतकरी बांधवांनी प्रतिकुल परिस्थितीत योग्य नियोजन करत जास्तीत जास्त ऊस उत्पादनाचे नियोजन करावे. आपल्या सर्वांच्या सहकार्याने आगामी हंगाम यशस्वीपणे पूर्ण करू.

### सरकारने ऊसाला प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे : पांडुरंग अभंग

माजी आ.पांडुरंग अंभग म्हणाले की, दुष्काळी परिस्थिती मुळे ऊसाची पुरेशी वाढ झालेली नाही, त्यातच हुमणी रोगांचा प्रादुर्भाव झाल्याने एकरी ऊस उत्पादन कमी होऊन साखर उताऱ्यात एक ते दीड टक्का घट येणार आहे, त्यामुळे शासनाने ऊसाला प्रतिटन ५०० रुपये अनुदान द्यावे अशी मागणी केली.

## श्रीरामपूर बसस्थानकाचा कायापालट होणार

### ९ कोटींच्या पुनर्बांधणी कामाचा शुभारंभ



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : गणेश चतुर्थीच्या मुहूर्तावर श्रीरामपूर बसस्थानकाच्या पुनर्बांधणीच्या सुमारे ९ कोटी ८१ लाख रुपयांच्या कामाचा शुभारंभ आमदार हेमंत ओगले यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष करण ससाणे यांच्यासह पदाधिकारी, नगरसेवक आणि नागरिक उपस्थित होते. आमदार ओगले म्हणाले, श्रीरामपूर बसस्थानकाच्या पुनर्बांधणीसाठी गेल्या दीड वर्षापासून शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा सुरू होता. यासाठी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनातही बैठका घेण्यात आल्या. या पाठपुराव्याला अखेर यश आले असून, बसस्थानकाचे दर्जेदार काम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांचे आभार मानले. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी विधानसभा निवडणुकीनंतर आमदार ओगले यांनी बसस्थानकाचा प्रश्न सातत्याने लावून धरल्याचे सांगितले. अधिवेशन तसेच मंत्रालयीन पातळीवर केलेल्या पाठपुराव्यामुळे कामाला मंजुरी मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. बसस्थानकाच्या विकासामुळे शहराच्या सौंदर्यात भर पडेल, असेही ते म्हणाले. जिल्हाध्यक्ष सचिन गुजर यांनी बसस्थानकाची जागा बळकावण्याचे प्रयत्न झाल्याचा आरोप करत, आमदार ओगले यांनी घेतलेल्या भूमिकेमुळे पुनर्बांधणीला गती मिळाल्याचे सांगितले. यावेळी विविध पदाधिकारी, नगरसेवक, कार्यकर्ते तसेच एसटीचे अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रामपूरवाडीत ६ महिन्यांपासून १५ तास वीज गायब



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील मौजे रामपूरवाडी येथील वीज पुरवठा गेल्या ६ ते ७ महिन्यांपासून दररोज १३ ते १५ तास खंडित होत असल्याने ग्रामस्थ त्रस्त झाले आहेत. या विरोधात माजी सरपंच संदीप तुकाराम सुरडकर यांनी महावितरण कंपनीला निवेदन देत वीज पुरवठा सुरळीत न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, रामपूरवाडी येथे कमी व्होल्टेजमुळे घरगुती विद्युत उपकरणे नादुरुस्त होत आहेत. सलग १३-१५ तास वीज नसल्याने शाळेतील मुलांचा अभ्यास होत नाही. शेतकऱ्यांना विहिरीचे पाणी देता येत नसल्याने उभी पिके जळून चालली आहेत. वारंवार तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्याने, दि. १८ सप्टेंबर रोजी महावितरणच्या कार्यालयासमोर अन्नत्याग उपोषण करण्यात येईल असे निवेदनात नमूद केले आहे. या निवेदनाच्या प्रती माहितीसाठी तहसीलदार, तहसील कार्यालय राहाता आणि पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन राहाता यांनाही देण्यात आल्या आहेत.

## गव्हाणवाडी गोळीबार, ओम भोंडेला शिरूरमध्ये ठोकल्या बेड्या




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा** : गव्हाणवाडी-शिरूर मार्गावरील घोडनदी पुलाजवळ जुन्या वादातून झालेल्या गोळीबाराच्या घटनेने परिसरात खळबळ उडाली आहे. स्थानिक गुन्हे शाखेने तपासाची चक्रे वेगाने फिरवत एका आरोपीला शिरूरमधून ताब्यात घेतले. ओम दीपक भोंडे (वय २१, रा. आण्णापूर, ता. शिरूर, जि. पुणे, हल्ली रा. बाबुरावनगर, शिरूर) असे ताब्यात घेतलेल्या आरोपीचे नाव आहे.

या घटनेची सविस्तर माहिती अशी की, १४ सप्टेंबर रोजी प्रशांत संदिप वाबळे (वय २१, रा. म्हसे, ता. पारनेर) हा मित्रासह शिरूरहून गणपती घेऊन घरी परतत होता. गव्हाणवाडी ते शिरूर मार्गावरील घोडनदी पुलाजवळ ते थांबले असताना आरोपींनी व्हेरना कार त्यांच्या अंगावर घालण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर किशोर शिंदे याने गावठी कट्ट्यातून फिर्यादीवर फायरिंग करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याचे पोलिसांच्या फिर्यादीत नमूद आहे.या थरारक घटनेप्रकरणी बेलवंडी पोलिस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३५०/२०२६ नुसार भारतीय न्याय संहितेतील कलम १०९(१), १८९(२), १९०, १९१(२) तसेच आर्म्स ॲक्ट कलम ३/२५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### एलसीबीने तपासाची सूत्रे हाती घेतली

अग्निशस्त्राचा वापर करून खुनाचा प्रयत्न झाल्याची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी स्थानिक गुन्हे शाखेला समांतर तपास करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पथके तयार करण्यात आली.गोपनीय बातमीदारांकडून मिळालेली माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपी ओम भोंडे हा शिरूरमधील बाबुरावनगर परिसरात राहत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पथकाने तातडीने शिरूर गाठून त्याचा शोध घेतला आणि त्याला ताब्यात घेतले. पुढील तपासासाठी आरोपीला बेलवंडी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.गोळीबाराच्या या प्रकरणातील इतर आरोपींचा शोधही सुरू असून, तपासाची दिशा आता महत्त्वाची ठरणार आहे.

## मुठेवाडगाव शिवारात अखेर बिबट्या जेरबंद | महिनाभर पिंजऱ्याला हुलकावणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील मुठेवाडगाव शिवारातील तांबे वस्तीवर गेल्या महिनाभरापासून हुलकावणी देणारा आणि परिसरातील वस्त्यांवरील कुत्र्यांचा फडशा पाडणारा बिबट्या अखेर पिंजऱ्यात जेरबंद झाला.

बिबट्या पकडल्याने ग्रामस्थांनी सुटकेचा निःश्वास सोडला; मात्र त्याचे तीन बछडे पळून गेल्याने परिसरात पुन्हा भीतीचे वातावरण निर्माण झाले



आहे. मुठेवाडगाव शिवारातील धोंडिबा तलावाच्या पायथ्याशी गट क्रमांक १९ मधील गोकुळ रायभान तांबे यांच्या शेतातील वस्तीच्या मागे वन विभागाने बिबट्या पकडण्यासाठी महिनाभरापासून पिंजरा लावला होता.

मात्र, बिबट्या पिंजऱ्याकडे फिरकत नव्हता. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो वस्त्यांवर येत असल्याने तांबे व लगतच्या वस्त्यांवरील अनेक कुत्र्यांचा फडशा पडला होता.

सोमवारी (दि.१४) रात्री वीजपुरवठा खंडित असताना बिबट्याने शेडमध्ये बांधलेल्या शेळीवर हल्ला केला.

कुटुंबीयांनी बॅटरीचा प्रकाश टाकताच बिबट्या अर्धवट जखमी शेळीला सोडून पळाला. गोकुळ तांबे यांनी शक्कल लढवत शेळी पिंजऱ्यातील जॉईन कप्प्यात ठेवली.

अवघ्या अर्ध्या तासात पिंजरा बंद झाल्याचा आवाज आला. ग्रामस्थांनी पाहणी केली असता मादी बिबट्या जेरबंद झाल्याचे दिसले. मात्र, पिंजऱ्याजवळ पोहोचताच तीन बछडे तेथून पळून गेले.

## घरासमोर गप्पा मारताना महिलेचा विनयभंग ; दोघांवर गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : परिसरातील लोहागाव रोड येथे घरासमोर गप्पा मारत असलेल्या ३२ वर्षीय महिलेचा विनयभंग करून तिला शिवीगाळ व मारहाण केल्याची घटना रविवारी (दि. १४) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास घडली. याप्रकरणी सोनई पोलिसांनी गुलाब बाबू शेख व सायराबानो गुलाब शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुभदा राजेंद्र बटुळे (वय ३२, रा. लोहागाव रोड, सोनई) या घरासमोर गप्पा मारत असताना दोन्ही आरोपी तेथे आले. त्यावेळी आरोपी गुलाब शेख याने फिर्यादीच्या ब्लाऊजला छातीच्या जवळ पकडून लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यानंतर दोन्ही आरोपींनी शिवीगाळ केली. सायराबानो शेख यांनी फिर्यादीला पकडून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचेही तक्रारीत नमूद आहे. या झटापटीत फिर्यादीच्या गळ्यातील सोन्याच्या मण्यांची पोत तुटून गळून पडल्याचे तक्रारीत म्हटले आहे. घटनेनंतर फिर्यादीने सोमवारी (दि. १५) सोनई पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस कॉन्स्टेबल बी. जी. बाचकर पुढील तपास करीत आहेत.

## स्वस्त धान्य दुकानात निकृष्ट दर्जाचा मका

### मोफत म्हणून गुणवत्तेकडे दुर्लक्ष का ?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील कारेगाव येथील स्वस्त धान्य दुकानामार्फत नागरिकांना वाटपासाठी आलेल्या मक्याचा दर्जा अत्यंत निकृष्ट असल्याचा प्रकार समोर आला आहे. उपलब्ध मक्यामध्ये मोठ्या प्रमाणात काळवंडलेले, खराब, तुटलेले व बुरशीसदृश दाणे आढळून आल्याने नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

नागरिकांना अन्नधान्य म्हणून देण्यात येणारा हा मका पाहता तो मानवी वापरासाठी



योग्य आहे का, असा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. मोफत धान्य म्हणून त्याच्या गुणवत्तेकडे दुर्लक्ष केले जात आहे का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

अशा प्रकारचे धान्य नागरिकांना वाटप करण्यापूर्वी त्याची गुणवत्ता तपासण्यात आली होती का? तसेच निकृष्ट दर्जाचा मका पुरवठा करणाऱ्या यंत्रणेची जबाबदारी कोणाची, याची चौकशी करण्याची मागणी होत आहे.

संबंधित विभागाने या मक्याचे तातडीने नमुने घेऊन शासकीय प्रयोगशाळेत तपासणी करावी, तपासणीचा अहवाल नागरिकांसमोर जाहीर करावा. मका निकृष्ट आढळल्यास संबंधित पुरवठादार व जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी आणि नागरिकांना दर्जेदार धान्य उपलब्ध करून द्यावे. धान्य मोफत असले तरी नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड करता येणार नाही.

गरिबांच्या ताटात दर्जेदार धान्यच मिळाले पाहिजे, अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य तसेच सामाजिक कार्यकर्ते सुनील गंगाधर पटारे यांनी केली आहे.

## सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन देणार

### आगामी गाळप हंगामासाठी मिळणार आधार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आणि सहकारी साखर कारखान्यांसाठी राज्य सरकारने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत सहकारी साखर कारखान्यांना सॉफ्ट लोन उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. या माध्यमातून २०२५-२६च्या गाळप हंगामातील थकीत एफआरपीची रक्कम देण्यास तसेच २०२६-२७च्या आगामी गाळप हंगामासाठी कारखान्यांना आर्थिक आधार मिळणार आहे.

सहकार आणि पणन विभागाच्या माध्यमातून हा निर्णय राबविला जाणार आहे. त्यामुळे एफआरपीच्या थकबाकीचा प्रश्न असलेल्या कारखान्यांना दिलासा मिळण्याची शक्यता आहे. आगामी हंगामासाठी आवश्यक आर्थिक नियोजन करतानाही या निर्णयाचा फायदा कारखान्यांना होणार आहे. मंत्रिमंडळाने शासनाच्या कामकाजात अधिक परिणामकारकता आणण्यासाठी 'महाराष्ट्र तांत्रिक सहाय्यता कक्ष' अर्थात 'महा-टॅक' स्थापन करण्यासही मंजुरी दिली आहे. भारतीय व्यवस्थापन संस्था, मुंबई आणि योजना व धोरणविषयक संशोधन केंद्र यांच्या शिफारशींच्या आधारे राज्यातील २५ प्रमुख धोरणे आणि २५ लोककल्याणकारी योजनांचे मूल्यांकन करण्यात येणार आहे. या मूल्यमापनातून योजनांची अंमलबजावणी, परिणामकारकता आणि शासनाच्या निर्णय प्रक्रियेत आवश्यक सुधारणा यांचा अभ्यास केला जाणार आहे. यासाठी एक वर्षाच्या मूल्यमापन प्रकल्पालाही मंजुरी देण्यात आली आहे.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या नाशिक शाखेला दिलासा देणारा निर्णयही घेण्यात आला. नाशिक महानगरपालिकेच्या मालकीच्या अभ्यासिका आणि वाचनालयाच्या इमारतीच्या भाडेपट्टा करारनाम्याच्या नोंदणीसाठी लागणारे मुद्रांक शुल्क माफ करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. मुंबई पोलीस हाऊसिंग टाऊनशिप प्रोजेक्टच्या अध्यक्षांच्या कार्यालयासाठी आणखी चार नवीन पदे निर्माण करण्यासही मंजुरी देण्यात आली. या पदांसाठी आवश्यक खर्चाची तरतूद करण्यास गृह विभागाला मान्यता देण्यात आली आहे. या निर्णयांसह सहकार, वित्त, नगरविकास, कृषी, महसूल आणि गृह विभागाशी संबंधित विविध प्रस्तावांना मंत्रिमंडळ बैठकीत मंजुरी देण्यात आली.